नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत मराठी अभ्यास परिषद, पुणे ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या भाषा आणि जीवन ह्या नियतकालिकाच्या (त्रैमासिक) अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून मराठी अभ्यास परिषदेद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व मराठी अभ्यास परिषद, पुणे यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व मराठी अभ्यास परिषद, पुणे यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठी अभ्यास परिषद पत्रिका

भाषा आणि जीवन

वर्ष २२ : अंक ३, पावसाळा २००४



अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

■

प्रकाशन : त्रैमासिक (जानेवारी, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर)

संपादन - समिती : मृणालिनी शहा (प्रमुख), अशोक रा. केळकर, गं. ना. जोगळेकर, मॅक्सीन बर्नसन, प्र. ना. परांजपे, द. दि. पुंडे, आशा मुंडले, अंजली सोमण, विजया देव, नीलिमा गुंडी

संपादकीय संपर्क व परीक्षणार्थ पुस्तके : मृणालिनी शहा, १, शीतल अपार्टमेंट, ४६/४, एरंडवणे, पुणे ४११ ००४. दू. क्र. २५४३३८६९

व्यवस्थापकीय संपर्क व पैशांचा भरणा : कार्यवाह, नीलिमा गुंडी, ३, अन्नपूर्णा, १२५९, शुक्रवार पेठ, सुभाषनगर गल्ली क्र. ५, वाडिया हॉस्पिटलसमोर, पुणे ४११ ००२. दू. क्र. २४४८६०१५

पत्रिकेची वर्गणी, जाहिरातीचे दर : आवरणपृष्ठ तीन पहा.

सूचना : पत्रिकेत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांच्या / लेखकांच्या मतांशी संपादक किंवा परिषद सहमत असतीलच, असे नाही.

या अंकाच्या प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अंशतः अनुदान मिळालेले आहे. तसेच मैसूर येथील भारतीय भाषासंस्थान यांचेही अनुदान मिळालेले आहे. तथापि या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्यशासन आणि भारतीय भाषासंस्थान सहमत असेलच असे नाही.

या अंकाचे मूल्य रु. २५/-

संपादक : मृणालिनी शहा.

प्रकाशक व मुद्रक : मराठी अभ्यास परिषदेसाठी नीलिमा गुंडी

मुद्रण स्थळ : पद्मरेखा आर्ट्स, १९४/२, नवी पेठ, पुणे ४११ ०३०.

संपादकीय

लोकोक्ती आणि पाऊस

दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला पावसाची वाट पाहत असताना सर्वत्र नैसर्गिक पर्यावरणाची चर्चा सुरू होते. या चर्चांमधून आणि पर्यावरण तज्ज्ञांच्या निरीक्षणांतून माणूस निसर्गापासून तुटत चालला आहे, असा सूर ऐकू येतो. स्वाभाविकपणेच तुमच्या आमच्या सारखी संवेदनाक्षम माणसेही आपापल्या परीने त्या गोष्टीचा विचार करू लागतात. पर्यावरणाबरोबरच निसर्गाच्या आणि माणसाच्या नात्याचा शोध घेऊ लागतात. हा शोध विविधप्रकारे घेता येत असला तरी माझ्यासारखी भाषानिरीक्षण करणारी व्यक्ती, संस्कृती, लोकसाहित्य आणि साहित्य यांच्यातील निसर्गविषयक रूपांच्या साहाय्याने मागोवा घेण्याचा प्रयत्न करणार, हे उघड आहे. साहित्याचा आधार घेण्यामागे महत्त्वाचे कारण आहे ते म्हणजे भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे परस्परांशी असणारे नाते. निसर्गाच्या पर्यावरणाच्या या विचार प्रवासामागचे निमित्त पावसाळा असल्याने अर्थातच "पाऊस" - पावसाळा ही या विचारांची दिशा निश्चित केली आहे.

साहित्यातून व्यक्त होणाऱ्या पावसाविषयीच्या जाणिवांचा ऐतिहासिक आढावा घेतला तर लक्षात येते, की संस्कृतीच्या विकासाच्या काळात मानवाने निसर्गाशी - भोवतालच्या परिस्थितीशी कधी मैत्री करत, कधी सामना करत तर कधी त्याच्यापुढे अगतिकता स्वीकारत आपली प्रगती केली आहे, याचे कितीतरी पुरावे वैदिक वाङ्मयात, संस्कृत साहित्यात सापडतात. पर्यावरण या आधुनिक संकल्पनेचा जो अर्थ आज आपल्याला अपेक्षित आहे, तो कदाचित त्यावेळी नसला तरी साहित्यात निसर्गविषयक जाणिवा प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे दिसतातच. त्याची व्याप्ती खूपच मोठी आहे म्हणून परंपरागत लोकजीवनाचा शब्दबद्ध आविष्कार असणाऱ्या लोकसाहित्याचा विचार येथे प्रामुख्याने करण्याचे ठरवले आहे. कारण लोकसाहित्यात लोकांच्या सांस्कृतिक जीवनाची अखंड परंपरा व्यक्त होत असते. सामूहिक मनाचा तो आविष्कार असल्याने सामान्यांच्या भावभावना तिथे व्यक्त झालेल्या असतात. त्यातही लोकसाहित्यातील लोककथा, म्हणी - वाक्प्रचार, उखाणे इत्यादी फक्त मौखिक गद्य परंपरेतील उदाहरणे विवेचनासाठी निवडली आहेत.

एकदा ही दिशा ठरण्याचा अवकाश, प्रथम आठवली ती बिरबलाची पावसाच्या नक्षत्रांची गोष्ट. "सत्तावीस मधून नऊ गेल्यावर किती उरतात?" दरबारात विचारलेल्या या त्याच्या प्रश्नाचे उत्तर होते शून्य. एकूण सत्तावीस नक्षत्रांमधून पावसाची मुख्य नऊ नक्षत्रे वजा जाता जीवन शून्यवत होते, असा अर्थ सूचित करणारी ही कथा बिरबलाप्रमाणे लोकांच्याही विलक्षण चातुर्याची साक्ष देणारी आहे. त्याचप्रमाणे मृगनक्षत्रात "पेर्ते व्हा ... पेर्ते व्हा" म्हणत फिरणाऱ्या 'पावशा' (याला पोपया किंवा मिरुग पक्षी अशीही नावे आहेत) पक्ष्याची सार्थ लोककथा महत्त्वाची आहे. तसेच "चातक पावसाची वाट पहात असतो" या लोकसमजुतीमागे आफ्रिकेतून फक्त पावसाळ्यापुरत्या येणाऱ्या कोकीळाच्या जातीतील पक्ष्याचे वास्तव आहे, हे जेव्हा कळते तेव्हा आपल्या पूर्वजांच्या निसर्गानुभवाची सखोलताच ध्यानात येते.

बिरबलाच्या कथेत पावसाळ्याची नऊ नक्षत्रे गृहीत धरली असली तरी ती रोहिणी, मृग, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वाफाल्गुनी, उत्तराफाल्गुनी, हस्त, चित्रा आणि स्वाती अशी बारा आहेत. यांतील प्रत्येक नक्षत्रातील पावसाचे रूप आगळेवेगळे आहे, त्याचे स्वतःचे वैशिष्ट्य आहे. आपल्या कृषिप्रधान परंपरेला त्यांचा चांगला परिचय होता. त्या त्या नक्षत्रात पडणाऱ्या पावसाचे वेगळेपण आणि शेतीवर होणारा त्याचा परिणाम या संबंधीची त्यांची निरीक्षणे थक्क करणारी आहेत. या बाबतीत रूढ झालेले वाक्प्रचार किंवा म्हणी यांतून मनुष्याचे आणि निसर्गाचे नाते किती दृढ होते, हे लक्षात येते. साधारणपणे मृग नक्षत्रात पावसाळ्याला सुरुवात होते. पण काही वेळा ती रोहिणीत होते. अर्थातच असा पाऊस पडला तर सुबत्ता येते, शेतकरी आनंदित होतात, माहेरवाशिणींना आवर्जून बोलावले जाते, हा सारा जीवन व्यवहार "पडतील रोहिणी तर भाऊ आणील बहिणी" या शब्दबंधातून व्यक्त होतो. क्रमाने येणाऱ्या या नक्षत्रांमध्ये पडणाऱ्या पावसावर शेतीची कामे अवलंबून असतात हे, "मृगाची पेरणी हत्तीची कापणी" या म्हणीतून स्पष्ट झाले आहे. पुष्य आणि आश्लेषा या दोन नक्षत्रांच्या जोडीची गंमतही पाहण्यासारखी आहे. पुष्य नक्षत्रात रात्रंदिवस रिपरिप पाऊस पडत असतो म्हणून त्याला "म्हातारा" (सासरा) म्हटले जाते. तर त्याच्या नंतर येणाऱ्या आश्लेषा नक्षत्राला "सूना" असे संबोधले जाते, कारण यातला पाऊस कधी कमी तर कधी जास्त पडतो तर कधी कधी पडतच नाही. पण जर या पावसाच्या सरी आल्या तर त्या जोरात असतात म्हणून "मामंजी तुम्ही पळापळा आम्ही येतो

सळासळा" असे म्हणण्याची रीत आहे. आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनातील दाखले देणाऱ्या या उक्तीचे निसर्गाच्या नात्यासंबंधीचे स्पष्टीकरण करण्याची गरजच नाही. या सारख्याच "पूर्वा पोळा, उत्तरा जोंधळा" किंवा "पडतील उत्तरा तर भात खाईना कुतरा" आणि "न लागल्या उत्तरा तर भात मिळेना पितरा" अशी कितीतरी उदाहरणे सांगता येतात. सर्वांना परिचित असणाऱ्या हस्त नक्षत्राचा थाट काही वेगळाच असतो. "पडतील हस्त तर कुळवाडी होतील मस्त" या म्हणीतील शब्दरचनेत लोकजीवनातील ठसका जाणवतो. तर लोकसाहित्यातील शब्दांच्या सौंदर्याचा, नादाचा प्रत्यय "पडतील चित्रा स्वाती तर पिकतील माणिक मोती, पण कापूस न मिळे वाती" या रचनेतून येतो. "पाऊस पडे, मोती गळे", "सरली सुगी बैस उगी" यां सारख्या अर्थघन म्हणींची रेलचेल असणाऱ्या या वारश्यामागे मराठी माणसाचा समृद्ध जीवनानुभव आहे, हे सहज लक्षांत येते.

लोकभाषेचा जिवंतपणा स्त्रियांच्या उखाण्यांमधूनही प्रतीत होतो. उखाण्यांमधून स्त्रीविशिष्ट भावभावनांबरोबर सभोवतालच्या परिस्थितीलाही शब्दबद्ध केलेले असते. त्यांची असंख्य उदाहरणे आहेत. त्यांतील वर्षातील बारा महिन्यांची वैशिष्ट्ये सांगणारा एकच उखाणा पाहूयात. "चैत्र आणतो झाडांना साड्या, वैशाख ओढतो वऱ्हाडाच्या गाड्या, ज्येष्ठ बसतो पेरीत शेती, आषाढ धरतो छत्री हाती, श्रावण लोळतो गवतावरती, भाद्रपद गातो गणेश महती, आश्विन करतो गोळा भात, कार्तिक बसतो दिवाळी खात", असे प्रत्येक महिन्याचे वैशिष्ट्य सांगत शेवटी "वर्षाचे महिने असतात बारा प्रत्येकाचा उद्योग न्यारा, सासूबाईंच्या पोटी जन्मला हिरा, मामंजीच्या मंदिलाला तुरा, साखर एकवेळ फिकी पडेल पण .... चे नाव ऐकताना सर्वांना गोड वाटेल" अशा झोकात हा उखाणा संपतो. या लांबलचक उखाण्यात काळानुसार बदल झालेही असतील पण त्यातील निसर्ग व जीवन यांना कवेत घेणारा भाव अबाधित राहणारा आहे.

पावसाच्या निमित्ताने घेतलेल्या लोकसाहित्याच्या या अल्पशा मागोव्याअंती हा पारंपरिक वारसा आधुनिक जीवनाच्या धावपळीत लुप्त झाल्याचीच जाणीव होते. निसर्गाचे नाते तुटत गेले तसतसे त्याचे भाषिक आविष्कार मागे पडत गेले, हेच खरे. आपल्या सारख्यांनी अशा प्रकारच्या विचारप्रवासातून ते पुन्हापुन्हा लोकांसमोर ठेवून, तुटत चाललेले त्यांचे आणि निसर्गाचे नाते जोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. निसर्गाचे आणि समाजाचे ऋण फेडण्याचा हा पावसाळ्याचा मुहूर्त सफळ होवो. आणि म्हणींमधील पावसासारखा खराही पाऊस पडो, हीच इच्छा! ■

मृणालिनी शहा

मराठीच्या विकासाच्या दिशा

मिलिंद बोकील

मराठी भाषेच्या विकासाबद्दल बोलताना पहिल्यांदा हे लक्षात ठेवले पाहिजे की, आपण मराठी भाषेचे रक्षण करण्याविषयी किंवा तिच्यावर आलेल्या संकटाविषयी बोलत नसून तिचा विकास कसा होईल; या विषयी बोलत आहोत. हा फरक महत्त्वाचा आहे; कारण हल्ली पुण्या-मुंबईसारख्या शहरांतील सुशिक्षितांत मराठी भाषा धोक्यात आल्याचीच चर्चा हमेशा होत असते. ती चर्चा गैरलागू नाही. पण विकासाचा विचार करताना मराठी भाषा ही जिवंत राहणार आहे किंवा आपण ती जिवंत ठेवणार आहोत; हे पहिल्यांदा गृहीत धरावेच लागते.

कुठल्याही विकासाच्या प्रक्रियेत मुख्यतः तीन गोष्टींचा विचार करावा लागतो : वाढ (विस्तार), पोत (दर्जा किंवा गुणवत्ता) आणि उंची (खोली). भाषेच्या संदर्भात बोलताना याच गोष्टी - ती भाषा किती जणांकडून बोलली जाते, निरनिराळ्या काळातील गरजा भागवण्यास ती भक्कम आणि लवचीक आहे की नाही आणि तिचा वाङ्मयीन साठा किती सखोल आहे - या प्रकारे मांडता येतील.

भाषिक समूहाच्या विस्ताराची किंवा वाढीची गोष्ट विचारात घेतल्यास मराठीची स्थिती वाईट नाही. १९९१च्या जनगणनेप्रमाणे मराठी ही मातृभाषा असणारे सुमारे साडे सहा कोटी लोक भारतात होते. आजमितीस ते साधारण आठ कोटी असतील. हा आकडा नगण्य नाही. भाषिक लोकसंख्येच्या बाबतीत मराठीचा क्रमांक जगात १७ वा लागतो. भारतीय उपखंडातल्या फक्त हिंदी, बंगाली आणि तेलुगू भाषाच या बाबतीत मराठीच्या पुढे आहेत. सध्या भारतातील लोकसंख्येच्या वाढीचा वेग सुमारे दोन ते अडीच टक्के इतका आहे. मराठी लोक हे या बाबतीत अधिक समंजस व सुधारक असल्याने त्यांच्यापुरता हा वेग एक टक्क्यावर जरी आला तरी पुढच्या पन्नास वर्षांत ही लोकसंख्या बारा-तेरा कोटींच्या घरात जाईल. हा विस्तार लहान-सहान नाही. ह्या सगळ्या लोकांनी इंग्रजी भाषेत शिक्षण घ्यायचे असे ठरवले तरी ते मराठी भाषा बोलायचे पूर्णपणे थांबतील, अशी शक्यता वाटत नाही. त्यामुळे पुढच्या पन्नास वर्षांत मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या ही भक्कमच राहणार.

आर्थिक विकासाच्या आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापराच्या बाबतीत वाढती लोकसंख्या हा अडथळा ठरू शकतो (ठरेलच असे नाही), पण भाषिक विकासाच्या बाबतीत मात्र तसे नाही. जास्तीत जास्त लोकांनी, जास्तीत जास्त ठिकाणी ती भाषा बोलणे हा कुठल्याही भाषेच्या विकासाचा पहिला टप्पा आहे. याचे कारण भाषा बोलणारे लोक वाढले, की ते ती भाषा निरनिराळ्या ठिकाणी, निरनिराळ्या प्रकारे आणि निरनिराळ्या कारणांनी बोलत असतात. जेव्हा एखादी भाषा व्यापक भूभागावर पसरलेली असते तेव्हा त्या भाषकांना साहजिकच मोठा अवकाश मिळतो. मग ती भाषा बोलणारे लोक आपापल्या परीने त्या भाषेचा विकास करत असतात. कधी ते ती भाषा घासून घासून गुळगुळीत करतात, कधी तिची रचना सोयीसाठी बदलून घेतात, कधी पूर्णपणे नवीन रचना करतात. भाषेच्या विकासासाठी संख्यात्मक वाढ आणि वर्चस्व आवश्यक आहेत. हिंदी व बंगालीच्या उदाहरणावरून ते आपल्याला स्पष्ट दिसते. या बाबतीत मराठीची परिस्थिती आशादायक आहे. यासाठी अर्थात मराठी लोकांनी आपली भाषा हिरिरीने बोलली पाहिजे; हे ओघानेच आले.

भाषा ही एक बोली असते, पण ती काही एकसंध बोली नाही. कुठल्याही भाषेत अनेक बोलीभाषांचा समावेश असतो. मराठीत तर तसे आहेच. महाराष्ट्र हा एक प्राचीन आणि भव्य प्रदेश असल्याने आणि शिवाय उत्तर आणि दक्षिण यांच्या संगमावर वसलेला असल्याने त्यात मराठीच्या अनेक बोलीभाषा आहेत. त्यांतील वऱ्हाडी, खानदेशी, दख्खनी, कोकणी असे ठळक वर्ग आपल्याला माहीत आहेत, पण त्या वर्गांमध्येही पोटवर्ग आहेत. उदाहरणार्थ, कोकणी प्रदेशामध्ये वारली, ठाकरी, कातकरी, आगरी, कुणबी, मालवणी असे अनेक पोटप्रकार आहेत. मराठीचा विकास व्हायचा असेल तर ह्या प्रत्येक बोलीभाषेचा विकास व्हायला हवा.

सध्या ह्या बोलीभाषांवर आधुनिकीकरणाची मोठी संक्रांत आलेली आहे. ह्या बोलीभाषा बोलणारे लोक शिक्षित झाले, की आपली बोली टाकून देऊन प्रथम प्रमाण-मराठी आणि मग तीही सोडून देऊन हिंदी व इंग्रजीचा आश्रय घेतात. प्रशासकीय वा ग्रांथिक व्यवहारात प्रमाण मराठीचा वापर जरुरीपुरता करावा, पण त्या त्या भागात दैनंदिन व कौटुंबिक व्यवहारांत बोलीभाषेलाच उत्तेजन द्यायला पाहिजे. त्या त्या भाषेतील सुशिक्षितांवर ही मोठी जबाबदारी आहे. त्यांनी आपल्या बोलीभाषांची लाज न बाळगता आपापल्या समूहात व प्रदेशात ती धडाक्याने बोलली

पाहिजे. त्या भाषेतल्या गाण्यांचे सूर त्या त्या आकाशात गुंजत राहिले पाहिजेत. तिथे एखादा समारंभ असेल तर अहिराणीच्या, कोळीगीतांच्या, वारली किंवा गोंडी लोकगीतांच्या कॅसेट्स निनादत राहायला हव्यात. या जोडीलाच बोलीभाषांचे व्याकरण अद्ययावत करणे, त्यांच्यात साहित्य निर्माण करणे, त्या साहित्याचा गावोगाव प्रसार करणे याही गोष्टी अग्रक्रमाने कराव्या लागतील. मराठीचा विकास हा बोलीभाषांच्या विविधतेत आणि त्यांच्या समृद्धीत सामावलेला आहे.

माणूस ज्या घरात वा परिसरात जन्मतो तिथली भाषा सहजगत्या बोलू लागला तरी त्या भाषेचे, विशेषतः लिखाण-वाचनाचे, शिक्षण हे शाळेतूनच घेतो. म्हणजे भाषाशिक्षणासाठी शाळा जरुरी आहे. पण या बाबतीत महाराष्ट्रातील परिस्थिती चिंताजनक आहे. महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण सुधारलेले असले तरी शाळेतील गळतीचे प्रमाण भयावह आहे. शाळेत भरती झालेल्या विद्यार्थ्यांपैकी सुमारे ५०% विद्यार्थी सातवीच्या पुढे जात नाहीत. आदिवासी व भटक्या जमाती, भूमिहीन शेतमजूर आणि शहरातील गरीब या घटकांतील विद्यार्थ्यांची आणि सर्व स्तरांतल्या मुलींची प्रामुख्याने गळती होते. महाराष्ट्र-मानव-विकास-अहवाल २००२ प्रमाणे महाराष्ट्रातील मुलगे सरासरी ७.४ तर मुली फक्त ४.१ इतकीच वर्षे शाळेत काढतात. मराठी भाषेच्या विकासाची चर्चा करायची असेल तर पहिल्यांदा ही गळती थांबवली पाहिजे. समाजातल्या फार मोठ्या वर्गाला जर भाषेचे शिक्षणच मिळणार नसेल तर भाषेच्या विकासाची चर्चा करणे व्यर्थ आहे.

याच महाराष्ट्र-मानव-विकास-अहवालाप्रमाणे गरिबी हे शाळा गळतीचे मुख्य कारण नाही तर बहुसंख्य मुलांना अभ्यासात रस वाटत नाही किंवा शिक्षण कंटाळवाणे वाटते म्हणून ती शाळेतून बाहेर पडतात. मराठीपेक्षा इंग्रजी व गणिताची मुलांना भीती वाटते हे खरे आहे; पण मराठीचे पुस्तकी शिक्षण अनाकर्षक असते हेही खरे आहे. सर्व मुले-मुली निदान दहावीपर्यंत शिकतील आणि त्या काळात मराठी भाषेतून सुंदर आणि रसाळ शिक्षण त्यांना मिळेल; असे पाहिले पाहिजे. या शिक्षणामधूनच मराठी भाषेचेही शिक्षण होईल. इतर कोणत्याही विषयाप्रमाणे ते शिक्षणही सुगम असायला हवे. व्याकरण व शुद्धलेखन किंचित अवघड असणे संभवते, पण ते अगम्य नको. समजावून सांगितले की समजले पाहिजे. इंग्रजीतून येणाऱ्या शब्दांच्या शुद्धलेखनाबाबत सध्या गोंधळ होतो, तो शक्य तितका कमी केला पाहिजे.

शाळागळतीच्या या प्रश्नाकडे बघितल्यानंतर इंग्रजीसारख्या परक्या भाषेतून

शिक्षण घेणे किती धोक्याचे आहे, हे खरे तर वेगळे सांगायला नको. मातृभाषेतून शिकताना एवढी गळती तर परभाषेतून शिकताना किती होईल? इंग्रजीतून शिकणे अशास्त्रीय तर आहेच पण अवघड आणि कंटाळवाणे देखील आहे. पण शहरातल्या सुशिक्षितांना आता हे ब्रह्मज्ञान सांगून काही उपयोग नाही. इंग्रजी भाषेतील शिक्षण हेच आपल्या मुलांचे जीवनवर्चस्व असल्याचे त्यांनी मानले असल्याने, मातृभाषेतून शिक्षण हेच सर्वोत्कृष्ट असे भाषाशास्त्रज्ञांनी कितीही कानीकपाळी ओरडून सांगितले तरी ते आता ऐकण्याच्या मनःस्थितीत नाहीत. त्यामुळे त्यांना उपदेश करत राहण्यात अर्थ नाही आणि त्यांच्यावर राग धरूनही उपयोग नाही. त्याऐवजी त्या मुलांपर्यंत चांगली मराठी पोचवण्यासाठी काही अभिनव मार्ग चोखाळावे लागतील.

त्यांतला एक मार्ग म्हणजे इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून चांगली मराठी पुस्तके पुरवणी वाचन म्हणून लावणे. चिं. वि. जोशी, पु. ल. देशपांडे, प्रकाश नारायण संत अशा लेखकांची पुस्तके या शाळातील मुलांना भरभरून दिली पाहिजेत, म्हणजे मराठीची गोडी त्या मुलांना लागेल. मात्र या बाबतीत सरकारच्या तोंडाकडे पाहून काही उपयोग होणार नाही. त्या त्या संस्थाचालकांनी त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. त्याशिवाय केवळ याच शाळेतल्या मुलांसाठी मराठी वक्तृत्व, निबंध, नाट्यछटा यांच्या स्पर्धा घेता येतील. याच पद्धतीने या शाळांत शिकणाऱ्या अमराठी मुलांना मराठीची ओळख आणि सहवास घडवता येईल.

महाराष्ट्रात राहणाऱ्या अमराठी लोकांना मराठीच्या कक्षेत आणणे, हीसुद्धा मराठीच्या विकासाची एक दिशा आहे. मात्र हे काम सक्तीने किंवा दमदाटीने होणारे नाही. ते सूक्ष्म रीतीने, प्रेमाने आणि नकळत होणारे आहे. मराठी गाणी, गोष्टी, नाटक, सिनेमा यांच्या आल्हाददायक आणि हव्याहव्याशा वाटणाऱ्या वातावरणात त्याना लपेटून टाकणे, हा त्यावरचा उपाय आहे.

भाषेच्या विकासामध्ये ती भाषा निरनिराळी कामे करण्यासाठी भक्कम आणि लवचीक करणे हेही महत्त्वाचे अंग आहे. माणसे भाषेचा उपयोग फक्त एकमेकांशी बोलण्यासाठीच करतात असे नाही तर स्वतःच्या मनात विचार करण्यासाठी आणि तो विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठीसुद्धा भाषेची आवश्यकता असते. नवा नवा विचार करण्यासाठी नव-नवीन संकल्पना लागतात तर तो वाहून नेण्यासाठी भाषेची नव्या तऱ्हेने मांडणी करावी लागते. कुठलीही भाषा हे काम कशा तऱ्हेने करू देते त्यावर त्या भाषेचा विकास अवलंबून असतो.

हे काम प्रत्यक्षात होण्यासाठी भाषेत निरनिराळे शब्द नित्यशः तयार व्हावे

लागतात. विशेषतः समाजात नवीन तंत्रज्ञान तयार होते तेव्हा आणि इतर भाषा आणि संस्कृतींशी संबंध येतो तेव्हा. भाषेत नवा शब्द तयार होण्याचे तीन प्रमुख मार्ग असतात. एक म्हणजे परभाषेतला शब्द जसाच्या तसा उचलणे (उदा. हॉस्पिटल), दुसरा म्हणजे त्या शब्दामध्ये बदल /मोडतोड करून त्या विशिष्ट उपयोगासाठी वेगळा शब्द तयार करणे (इस्पितळ - यातला तळ शब्द मौजेचा आहे) आणि तिसरा म्हणजे भाषेच्या मूळद्रव्यापासून नवीन शब्द बनवणे (रुग्णालय). ह्या तिन्ही पद्धतींनी मराठीत नवीन शब्द बनवावे लागतील. क्रियापदांच्या बाबतीत 'बघितलंय', 'सांगितलंय', 'चालवलंय' अशा रचना मान्य करून घ्याव्या लागतील.

दिल्ली - पंजाबकडे, 'मेरे ब्रदरकी वाइफ संडेको आ रही है' अशी वाक्ये सर्रास बोलली जातात. आता ब्रदर, वाइफ आणि संडे या संकल्पना व त्याला योग्य शब्द काय हिंदीत नाहीत का? पण लोकांची भाषा आता तशीच झाली आहे. त्याचा राग धरून उपयोग नाही, उलट ब्रदर, वाइफ आणि संडे हे शब्द हिंदीतलेच मानून चालावे लागतील. हे लोण मराठीतही येतच आहे. 'मी रिटर्न तिकीट काढलं, पण ते चेक झाले नाही' किंवा 'मी बँकेत चेक भरला, पण तो कॅश झाला नाही' ही वाक्ये आता शुद्ध मराठीच मानावी लागतील. कारण 'तिकीट' अणि 'बँक' हे शब्द जसे पूर्वीच मराठी झाले तसेच 'रिटर्न', 'चेक' व 'कॅश' हे शब्दही मराठी मानणे क्रमप्राप्त आहे.

असे असले तरी मराठीत प्रतिशब्द तयार करणे थांबवून चालणार नाही, कारण कित्येकदा परक्या शब्दाला अधिक सोपा आणि अचूक शब्द आपण देऊ शकतो. उदाहरणार्थ Organisation साठी संघटन, Conscientization साठी जाणीवजागृती, Advocacy साठी समर्थन, इत्यादी. लोकांना व्यवहारात पर्याय असणे आवश्यक असते. कंप्युटरला खरं तर 'संगणक' हा उत्तम प्रतिशब्द आहे, पण व्यवहारात लोक कंप्युटर हा शब्दच वापरतात. कंप्युटर म्हणावे की संगणक असा वृथा वाद आपण घालू नये. दोन्ही शब्द वापरावेत. जमल्यास आणखी नवीन शब्द सुचवावेत. त्यासाठी बोलीभाषांकडे जावे. जेवढे शब्द जमतात तेवढी भाषा अधिक समृद्ध होते. स्टेशन म्हणावे, स्थानक म्हणावे, ठेशन तर म्हणावेच म्हणावे. इंग्रजीने जसे निरनिराळ्या पद्धतींनी शब्द जमवले आहेत तसेच आपण केले पाहिजे. त्यातून अर्थाच्या विविध छटा उलगडतात आणि भाषा समृद्ध होते.

भाषेचं एक महत्वाचं अंग काम निरनिराळ्या प्रकारची माहिती आणि ज्ञान देण्याचं आहे. सध्या ह्या ज्ञानाचा आणि माहितीचा उगम पाश्चात्त्य देशांत होत आहे

अनुक्रमणिका

आणि साहजिकच ते ज्ञान इंग्रजी भाषेत आहे. हे ज्ञान मराठी भाषेत आणण्याचं काम महाराष्ट्रात चालू आहे, विशेषतः विज्ञानाच्या क्षेत्रात. विज्ञानावरची अनेक मनोरंजक पुस्तके मराठीत सतत प्रकाशित होत असतात. मराठी लोकांजवळ असलेली साधन सामग्री लक्षात घेता ते बऱ्यापैकी समाधानकारकरीत्या चालू आहे, असे म्हणायला पाहिजे. पुढेही ते चालू राहील असा प्रवाह दिसतो. ही मराठीच्या विकासाची एक महत्त्वाची दिशा आहे.

खरा प्रश्न नवीन ज्ञान निर्माण करण्याचा आहे. भौतिक विज्ञानाच्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपण ते कितपत करतो किंवा करू शकू ही शंका आहे. कारण महाराष्ट्र म्हणूनच नव्हे तर भारत म्हणूनही आपण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या संशोधनाला पुरेशी साधन-संपत्ती बहाल केलेली नाही. विज्ञानातील संशोधनासाठी आपण प्रामुख्याने पाश्चात्त्य देशांवर अवलंबून आहोत. त्यामुळे ह्या क्षेत्रातील ज्ञान व माहिती मुळात मराठीत तयार होण्यास मर्यादा आहेत.

मात्र सामाजिक विज्ञानाच्या क्षेत्रात ही मर्यादा आपण ओलांडू शकतो. अर्थात त्याही क्षेत्रातल्या संशोधनाला आपण काही खास मदत करतो असे नव्हे. या क्षेत्रातली आपली गरिबी अधिकच दारुण आहे. पण तिथे निदान आपल्याकडे संशोधनाचा ऐवज तरी भरपूर आहे. केवळ सामाजिक समस्या जास्त व कठीण आहेत म्हणून नव्हे तर आपला सामाजिक-सांस्कृतिक इतिहास शेकडो वर्षांचा आहे म्हणून. समाजशास्त्र, मानवशास्त्र, राज्यशास्त्र हे विषय आपल्याकडे वसाहतवादी पार्श्वभूमीतून आले खरे, पण आता ते आपले झालेले आहेत. मुळात माणूस, माणसाचा समाज आणि तो चालवणारी राज्यसंस्था या गोष्टी युरोपियन लोकांच्या आधीपासूनच आपल्याकडे होत्या. ह्या विषयांमध्ये आपण स्वयंभू ज्ञान निर्माण करू शकतो. ते ज्ञान युरोपियनांपेक्षा कितीतरी उजवे राहील, कारण आपल्याकडे सामाजिक - सांस्कृतिक विविधता आश्चर्यकारक आहे, आपला इतिहास अधिक गुंतागुंतीचा आहे आणि आपल्याकडे सत्याचा शोध घेण्याची फार जुनी परंपरा आहे.

हाच मुद्दा आपल्याला विकासाच्या तिसऱ्या अंगाशी जोडून घेता येईल. तो म्हणजे मराठीत सखोल आणि उत्तुंग वाङ्मय निर्माण करण्याचा. मराठीतील वाङ्मयीन परंपरा पुष्कळ जुनी आहे आणि चांगलं वाङ्मय तयार झालेलं आहे. आज आम्ही लेखक जे लिहीत आहोत ते ठीक आहे, बरं आहे, चांगलं आहे; पण त्यामध्ये अजूनही उंच झेप घेण्याची गरज आहे. बहिणाबाई चौधरी, जी. ए.

कुलकर्णी, माडगूळकर बंधू, दया पवार, नारायण सुर्वे, गौरी देशपांडे यांसारख्या लेखकांनी लिहिलेलं साहित्य जागतिक दर्जाचं आहे. पण जगात आपल्या भाषेचा जर खरोखरच प्रभाव पडायचा असेल तर आपल्याला तिच्यात अफाट दर्जाचं साहित्य निर्माण करावं लागेल. असं उत्तुंग, बेदरकार साहित्य की ज्यामुळे इतर सर्वांचे डोळे दिपून जातील. असं काम आपण जोपर्यंत करत नाही तोपर्यंत आपली भाषा उंच चढणार नाही. हे काम होण्यासाठी वाचनाची भरघोस परंपरा जशी हवी तसेच उत्साहवर्धक वाङ्मयीन वातावरण हवे. सध्या दिखाऊपणा, कंपूशाही, साहित्यिकांचे क्षुद्र अहंकार आणि विचारवंतांमधला तुच्छतावाद यामुळे मराठीचा शक्तिपात होतो आहे. तो थांबवून एकदिलाने आपली सगळी ताकद मराठीच्या उत्कर्षाकरता लावली पाहिजे.

मराठी लोकांची प्रवृत्ती आणि इतिहास लक्षात घेता तीन क्षेत्रे अशी दिसतात की ज्यामध्ये मराठीचा विकास प्रभावीपणे होऊ शकतो. ती म्हणजे - कला, सामाजिक विचार आणि अध्यात्म.

कविता, कथा, कादंबरी, नाटक, सिनेमा, गाणी, नृत्य आणि संगीत अशा कलेच्या प्रत्येक माध्यमात मराठी आपला ठसा उमटवू शकते. आणि हे काम हिरिरीने केले पाहिजे. उत्तम कविता, उत्तम कथा, उत्तम नाटक, उत्तम सिनेमा जर मराठीत निघाला तर मराठीचा दबदबा चौफेर पसरू शकतो.

अशीच गोष्ट सामाजिक विचाराच्या बाबतीत आहे. सामाजिक, सुधारकी विचाराची मराठीतली परंपरा जुनी आणि भारतीय भाषांत अग्रगण्य स्वरूपाची आहे. लोकहितवादी, रानडे, फुले, आगरकर, महर्षी शिंदे, आंबेडकर, सावरकर, विनोबा भावे अशी सामाजिक विचारांची प्रभावळ मराठीत खडी आहे. अशा विचारांमुळेच विसाव्या शतकाच्या सुरवातीस महाराष्ट्र सबंध देशात अग्रेसर होता. आजही मराठीमध्ये सामाजिक विचाराची जी पातळी आहे ती देशात अग्रगण्य आहे. सामाजिक समता, स्त्री-मुक्ती, अंधश्रद्धा-निर्मूलन, आदिवासींचे हक्क, पर्यावरणवाद, विकासाच्या प्रश्नांची चर्चा या बाबतीत मराठीत जे विचारमंथन चालते ते लक्षणीय आहे. असा सामाजिक विचार ही मराठीची ताकद आहे. पुढच्या काळात ती अधिक वाढवली पाहिजे. मात्र मराठीतल्या सामाजिक विचाराला अनेकदा पूर्वग्रहांचे ग्रहण लागते आणि तो विचार पठडीबाज आणि झापडबंद होतो. त्याऐवजी तो निकोप, मोकळा आणि सुसंवादी झाला तर त्या विचाराची शक्ती तर वाढेलच पण त्याचा जनसामान्यात प्रसारही होईल.

अनुक्रमणिका

अशीच गोष्ट धर्म, अध्यात्म आणि तत्वज्ञानाच्या क्षेत्रात आहे. आपला विश्वास बसणार नाही, पण आध्यात्मिक साहित्याला मराठीत जेवढी मागणी आहे तेवढी दुसऱ्या कोणत्याच साहित्याला नाही. मौजेची गोष्ट म्हणजे ही मागणी तरुण वर्गाकडूनसुद्धा आहे. मानवी मनाला स्वाभाविकरीत्या आध्यात्मिक गोष्टींची भूक असते. सध्याच्या संभ्रमाच्या, अस्थिरतेच्या आणि असुरक्षिततेच्या काळात ती वाढली नाही तरच नवल. मराठी ही भूक भागवायला समर्थ आहे. ज्ञानेश्वर-तुकारामांपासून ते अलीकडच्या काळातील गाडगेमहाराज- तुकडोजीबाबांपर्यंत मराठीत आध्यात्मिक - धार्मिक - सामाजिक विचारांची एक वेगळी परंपरा आहे. किंबहुना धर्म, अध्यात्म, तत्त्वज्ञान, सामाजिकता, माणुसकी आणि काव्य यांचे एक विलक्षण रसायन मराठीत कायमच तयार होत आले आहे. आधुनिक काळातसुद्धा पांडुरंगशास्त्री आठवल्यांसारख्यांनी धार्मिक-आध्यात्मिक परंपरेच्या माध्यमातून सामाजिक संघटनाचे काम केले आहे. आधुनिक अध्यात्म हे अरविंद-कृष्णमूर्ती यांच्या शिकवणीप्रमाणे भव्य आणि सखोल नसेल; त्यात काहीसा बाजारूपणाही आहे, पण समाजातल्या बहुसंख्यांना ते भावनिक निवारा पुरवते ही वस्तुस्थिती आहे. हे असे एक क्षेत्र आहे की आधुनिक महाराष्ट्रीय माणसाला मराठीकडे येण्याशिवाय इलाज नाही. मराठीतले बाकी वाङ्मय किती शिल्लक राहील कुणास ठाऊक पण हे वाङ्मय मात्र अक्षर आहे. अशा तऱ्हेचे वाङ्मय निर्माण होत राहणे आणि त्यायोगे मराठीवरची श्रद्धा व निष्ठा घट्ट होत राहणे ही मराठीच्या विकासाची एक दिशा आहे. अर्थात ते खऱ्या अर्थानं आध्यात्मिक हवं आणि त्यातून अंधश्रद्धा आणि ढोंगबाजी वाढायला नको हे उघडच आहे.

या सगळ्याचा अर्थ असा की, मराठी वाङ्मयाने अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे की आपल्या जीवनात मराठीशिवाय गत्यंतर नाही असे महाराष्ट्रीय माणसाला वाटले पाहिजे. आपण मराठी वाचली नाही, बोलली नाही, लिहिली नाही तर आपल्या जीवनात काहीतरी कमीपणा आहे, आपले जीवन सार्थकी लागले नाही असे महाराष्ट्रातल्या प्रत्येक माणसाला वाटले पाहिजे. अमराठी माणसानेही असे म्हटले पाहिजे की, मराठी गाणी ऐकली नाहीत, मराठी कथा वाचली नाही, मराठी सिनेमा पाहिला नाही तर आपले जीवन व्यर्थ गेले. एवढेच नव्हे तर भारतातल्या सर्व लोकांना असे वाटले पाहिजे की, चांगली कविता हवी तर मराठी वाचली पाहिजे, चांगले समाजशास्त्र वाचायचे तर मराठीकडे गेलं पाहिजे आणि आत्म्याचं समाधान करून घ्यायचं असेल तर मराठीशिवाय पर्याय नाही.

मराठीच्या विकासातली मुख्य अडचण म्हणजे सध्या मराठी माणसांना आलेले हृदयदौर्बल्य. शहरातला मराठी माणूस संभ्रमाने ग्रासला आहे, भांबावल्यासारखा झाला आहे. जागतिकीकरणात मराठीचे काय होणार, अशी भीती त्याला वाटते. ही भीती निराधार नाही, पण जागतिकीकरणाचा खरा फटका दांभिक राष्ट्रीयतेला बसणार आहे. जागतिकीकरणात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे हितसंबंध जरी प्रभावी असले तरी त्यांना वेसण घालण्याचे प्रयत्न सर्वत्र होत आहेत. मुख्य म्हणजे जागतिकीकरणामुळे स्थानिक संस्कृती नष्ट होण्याऐवजी त्यांची स्वयंपूर्णता टिकून राहून त्यांचे एकमेकांशी जोडलेले वैश्विक महाजाल तयार व्हावे असेही प्रयत्न जगभर चालू आहेत. मराठी माणसांचे संख्याबळ इतके आहे, की त्यांनी केवळ आपापसातच मराठी बोलणे, वाचणे, लिहिणे चालू ठेवले तरी तिला धक्का लागू शकत नाही.

मात्र संख्याबळ असले, अस्तित्वाची जाणीव असली आणि वाढीची गती असली तरी भाषिक पराक्रम हा करावाच लागतो. मराठीच्या विकासासाठी आज त्याचीच आवश्यकता आहे. हे काम हिमतीने, नेटाने आणि एकदिलाने करण्याचे आहे. भाषिक अस्मितेचे लबाड राजकारण करून किंवा नुसते शड्डू ठोकून करायचे हे काम नाही. त्यासाठी भाषेवर खरे प्रेम पाहिजे आणि आपली भाषा केवळ टिकवायचीच नाही तर वाढवायची आहे असा दुर्दम्य निश्चयसुद्धा! सध्याचा काळ हा त्यासाठी अत्यंत उपयुक्त काळ आहे. शंभर वर्षांपूर्वी केशवसुतांनी जे आवाहन केले ते आजच्या काळालाही लागू आहे.

"प्राप्तकाल हा विशाल भूधर
सुंदर लेणी तयात खोदा
निजनामे त्यावरती नोंदा
बसुनी का वाढविता मेदा
विक्रम काही करा, चला तर"

("मराठीच्या विकासाच्या दिशा" या २१ डिसेंबर, २००३ रोजी, मराठी अभ्यास परिषदेने आयोजित केलेल्या चर्चासत्रात वाचलेला निबंध)

■

७, मुक्ता कॉम्प्लेक्स, एरंडवणे, पुणे ४११ ००४

दोन शब्द : थोडा अर्थविचार

माणिक धनपलवार

ग्रंथ वाचीत असताना काही शब्दांचा रूढ अर्थ आपण गृहीत धरून चालतो. अन्य भाषांतून आपल्या भाषेत आलेले शब्द मुळापेक्षा वेगळ्याच अर्थाने प्रचलित होतात. काही काव्यस्थली एखादा पाठ योग्य वाटतो; पण विचारांती त्याच्या मर्यादा जाणवतात. प्रस्तुत ठिकाणी 'चुकुर' व 'कर्मरी' या दोन शब्दांचा विचार केला आहे.

चुकुर - चुकुर हा शब्द रघुनाथ पंडितांच्या दमयंती - स्वयंवरात आला आहे. त्याचे अ.का. प्रियोळकरांनी 'चकित, घाबरे' हे अर्थ दिले आहेत. पण हे अर्थ संबंधित श्लोकातील आशयासंदर्भात कितपत लागू पडतात हा प्रश्न पडतो. 'चुकुर' शब्द आलेला दमयंती - स्वयंवरातील श्लोक पुढीलप्रमाणे -

करुनि मज रवाना राजसे तूजसाटीं
नृपति निरखि माझी वाट आरामवाटीं
बसवुनि निज पाठीं तूज नेईन तेथें
परि चुकुर तुझे हे लोक होतील येथें - १४०

या श्लोकाच्या अगोदर आलेल्या कथाभागात हंसाने नळाची विरहावस्था दमयंतीला कथन केलेली असते. या श्लोकात हंस दमयंतीला सांगतो - मला तुझ्याकडे पाठविल्यानंतर नळराजा उद्यानात बसून माझी प्रतीक्षा करीत असेल. तुम्हा दोघांची भेट त्वरित घडविण्यासाठी मी तुला पाठीवर वाहून नेले असते; पण लोक चकित होतील किंवा घाबरतील म्हणून तसे करता येत नाही. प्रियोळकरांच्या दृष्टीने, या श्लोकाचा असा अर्थ होतो.

दोन प्रेमिकांना एकत्र आणू इच्छिणाऱ्या हंसाने दमयंतीला पाठीवर बसवून नेणे ही लोकांच्या दृष्टीने निश्चितच आश्चर्यकारक घटना होय. सर्वजण विस्मयचकित होऊन त्याकडे पाहतील हे खरे; पण तसे करण्यात हंसाला संकोच वाटण्याचे कारण काय? नळाच्या विरहाची जी तीव्रता वर्णन केलेली आहे, त्या पार्श्वभूमीवर हे योग्य ठरत नाही. शिवाय ज्या राजाने त्याला 'जीवदान' दिले, त्यातून उतराई होण्याची ही नामी संधी चालून आली होती. लोकांनी आश्चर्यचकित

होणे किंवा घाबरणे हे दमयंतीला घेऊन न जाण्याचे अपरिहार्य कारण होऊ शकत नाही. यामुळे येथे 'चुकुर' याचा 'सावध' हा अर्थ घ्यावा लागतो. पित्याच्या अनुमतीविना राजकन्येस नेताना राजाचे सेवक व प्रजा सावध होऊन त्याला पकडतील. एवढेच नव्हे तर त्याला या अपराधाबद्दल शिक्षाही होऊ शकते आणि याचीच भीती हंसाला वाटत होती.

रामदासांनी 'दासबोधा'त याच अर्थाने हा शब्द योजिला आहे. "चुकुर होईजे मानसें । या नांव अध्यात्म", (३-६-५०) मन नित्य सावध असले, जागरूक असले, तरच अध्यात्मविद्येत गती प्राप्त होईल, असे ते म्हणतात.

'महाराष्ट्र शब्दकोशा'त भ्रम, भ्रांती, चकित झालेला, गोंधळलेला हे अर्थ दिले आहेत. प्रियोळकरांनी दमयंती-स्वयंवराच्या टिपणात या अर्थाची उदाहरणे दिली आहेत. संदर्भानुसार त्या त्या स्थळी ते ते अर्थ होत असतीलही. पण प्रस्तुत श्लोकात त्या अर्थांनी हा शब्द आलेला नाही. मुख्य म्हणजे, 'चुकुर'च्या 'सावध' या अर्थाला तेलुगू / कन्नडचा आधार आहे. या दोन्ही भाषांत 'चुरुकु' हा शब्द सावध होणे, जागृत होणे, क्रियेस प्रवृत्त होणे या अर्थी येतो. या 'चुरुकु' चा वर्णविपर्यय होऊन 'चुकुर' हा शब्द निष्पन्न झाल्याचे स्पष्ट दिसते. 'चुरुकु' हा शब्द तत्सम नव्हे. यामुळे याचे विभिन्न अर्थ लेखकांच्या समजुतीनुसार झालेले दिसतात. शब्दाच्या अर्थात अशा कारणामुळे बदल घडल्याची उदाहरणे आढळून येतात. मूळ संस्कृत शब्दांचे विभिन्न अर्थ अनेक प्रादेशिक भाषांतून झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. अनेकदा शब्दाचा मूळ अर्थ जाऊन अपसमजामुळे त्याच्याविरुद्ध अर्थही रूढ होतो. रामदास आणि रघुनाथ पंडित हे समकालीन. यामुळे दोघांनी एकाच अर्थाने हा शब्द योजणे आपल्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. 'चुकुर' या शब्दाचा यादृष्टीने विचार व्हावा.

कर्मरी - कर्मरी हा शब्द तुकारामांच्या अभंगात येतो. पुढील दोन चरणातून हा शब्द आला आहे.

- काय देह घालू कर्वती कर्मरी / टाकू या भीतरी अग्निमाजी

तुकाराम गाथा, १११८

- कर्वती कर्मरी देहासी दंडण - क्र. २४९४

तुकारामांच्या या प्रसिद्ध अभंगात ईश्वरप्राप्तीच्या अभावी जीवन संपविण्याची भाषा तुकाराम करतात. अनन्यभक्तीला जेव्हा यश मिळत नाही, तेव्हा अनेक संतांनी आपली अगतिकता अशीच व्यक्त केली आहे. कुठल्या तरी

साधनाने हे जीवन एकदाचे संपवावे असे तुकारामांना वाटते.

उपरोक्त अभंगातील 'करवत' शब्दाचा अर्थ स्पष्ट असला तरी 'कर्मरी' या शब्दाचा अर्थ काय करावा हा प्रश्न आहे. 'संत, लोक आणि अभिजन' या ग्रंथातील "लोकतत्त्वीय अध्ययनदृष्टी" या लेखात रा. चिं. ढेरे यांनी या शब्दावर विस्ताराने लिहिले आहे. (पृ.४६) 'कर्मरी' याचा करवतासारखे एखादे शस्त्र असा अर्थ विष्णुबुवा जोग यांनी केला आहे. महाराष्ट्र शब्दकोशातही असाच अर्थ दिला आहे. पण तो ढेरे यांना मान्य नाही. त्यांच्या मते येथे 'कर्मरी' ऐवजी 'कनुमारी' हा शब्द मुळात असावा. कारण 'कर्मरी'चा कुठलाही अर्थ होत नाही.

रा. चिं. ढेरे यांच्या मते कनुमारी म्हणजे श्रीशैल्य येथील उंच डोंगरावरील शिखराची जागा. ही जागा इतिहासप्रसिद्ध असून येथून श्रद्धाळू शिवभक्त मोक्षप्राप्तीसाठी खोल दरीत उडी मारून प्राणत्याग करीत. विशेषतः शिवरात्रीस अशा भक्तांची रांग लागलेली असे. विठ्ठल दर्शनाभावी असाहाय्य झालेले तुकाराम सहज उपलब्ध होणाऱ्या अग्नी, करवतादी साधनांच्या बरोबर पर्यायी म्हणून श्रीशैलमच्या खडतर प्रवासाचा मार्ग अवलंबून तेथील कनुमारीवरून उडी मारून देहत्याग करू इच्छितात. या स्थळाला राघवांक या वीरशैव कवीने आपल्या 'सिद्धरामचरिंते' या कन्नड ग्रंथात 'रुद्रकम्मरि' (म्हणजे भयंकर खोल दरी) म्हणून संबोधले आहे.

'कनुमारि' हा तेलुगु देश्य शब्द असून त्याचा 'पर्वतसानुवु' असा अर्थ 'सूर्यरायांध्र निघंटुवु' खंड २ (आंध्र प्रदेश साहित्य ॲकेडेमी, हैद्राबाद १९७९, पृ.८५) यात दिलेला आहे. 'सानुवु' या तेलुगु शब्दाचा अर्थ 'उतार' असा होतो. तेव्हा 'कनुमारि' म्हणजे डोंगरावरील उताराची जागा. 'कनुमा' या घटक शब्दाचा अर्थ 'तेलुगु शब्दरत्नाकरा'त 'संदु' (मराठीत सांद असा अर्थ) असा दिलेला आहे. म्हणजे (दोन डोंगरामधील) अरुंद जागा म्हणजे पर्यायाने 'दरी' असा याचा अर्थ होतो. 'कनुमा' या शब्दाची कन्नडमध्ये 'कणिवे', तुळुभाषेत 'कणिमे' तर तमिळमध्ये 'कणवै' अशी रूपे आहेत. याचाच अर्थ असा की, 'कनुमारि' हा द्रविड भाषांतील शब्द होय. तेव्हा 'कनुमारि'याचा विग्रह कनुमा + अरि असा होतो. 'अरि' याचा अर्थ द्रविड भाषांतील शब्दकोशात कुठेही आढळून आला नाही. पण त्याचा अर्थ 'धारण करणारा' असावा असे संदर्भावरून वाटते. 'अरि'या पदाचा निश्चित अर्थ देता येत नसला तरी त्यामुळे 'कनुमा' हा शब्द तेलुगु भाषेतील होय या सत्यास बाध येत नाही. परिणामतः, 'कनु + मारि' असा जो विग्रह रा. चिं.

ढेरे यांनी केला आहे, तो तसा करता येत नाही. त्यांच्या मते कनु म्हणजे पाहणे (कण् म्हणजे डोळा) व 'मारि' म्हणजे मरण असा संबंध जुळवून - जे आपले मरण स्वतःच्या डोळ्यांनी पाहतात - (कनुमारीवरून उडी घेणारे लोक) असा अर्थ केला आहे. पण मूळ शब्द 'कनुमा' असा असल्यामुळे ढेरे यांचा शब्द विग्रह व त्यावरून लावलेला अर्थ बरोबर ठरत नाही. शिवाय पहिले पद द्रविड भाषेतील तर दुसरे पद संस्कृतातील असल्यामुळे हा विसंगत वा अप्रयोजक संधी होतो. तसेच 'कनुमारि' हे विशेषनाम नसून सामान्य नाम होय. म्हणजे खोल दरी कुठेही असू शकते, ती श्रीशैल्यमलाच आहे, असे नव्हे. पण ढेरे तसे मानतात. तेव्हा तुकारामांना कुठलाही विवक्षित डोंगर वा दरी अभिप्रेत आहे असे नव्हे.

पर्वतावरून देह लोटून देण्याची भावना तुकारामांप्रमाणे अन्य संतांनीही व्यक्त केली आहे. श्रीपादराय या १५ व्या शतकातील कन्नड संतकवीचे तुकारामांशी याबाबतीत बरेच साम्य आहे. त्यानेही आपल्या रचनांत करवताचा व दरीचा इतर अनेक समान साधनांबरोबर निर्देश केला आहे. ते लिहितात -

- मी माझे शिर करवतावर टाकू काय?
- पर्वतावरून खाली दरीत उडी मारू काय?
(परुवतवनेरुरुळलो कृष्णा)

हरिदास कीर्तने : श्रीपादराजकृतिगळु
क्र. १० -२ व ६

रामदासांच्या 'दासबोधा'त -
देवास सिर वाहावे । का ते आंग समर्पावे
पडणीवरून घालून घ्यावे ... २-६-३१

पडणीवरून म्हणजे डोंगराच्या उतारावरून स्वतःचा देह झोकून देणारे भक्त असतात असे रामदासांनी येथे म्हटले आहे.

कन्नडमध्ये कनुमारिसाठी 'कम्मरि' हा शब्द रूढ आहे. दोन्ही शब्दांचा अर्थ एकच. 'कर्मरी'च्या जागी पाठ घ्यावयाचाच झाल्यास 'कम्मरि' हा पाठ घेणे सयुक्तिक ठरते. 'कम्मरी'चे कर्मरी होऊ शकते, पण 'कनुमारी'चे 'कर्मरी' असे रूप होणे कठीणच.

एका दृष्टीने 'कनुमारी' किंवा 'कम्मरि' यांपैकी कुठलाच पाठ घेण्याची आवश्यकता पडू नये. संस्कृतमध्ये 'कर्मार' म्हणजे लोहार. गोमंतकात लोहारास 'कर्मार' असेच म्हणतात (बा. द. सातोस्कर : गोमंतक प्रकृती आणि संस्कृती,

भाग १, पृ.२८९). तेव्हा या ठिकाणी 'कर्मरी' तृतीयान्त घेतल्यास 'लोहाराने बनविलेले करवत' असा अर्थ निष्पन्न होतो. अर्थात हा मतभेदाचा भाग आहे.

आतापर्यंतच्या विवेचनाचे, स्पष्टीकरणाचे तात्पर्य असे - 'कनुमारी' हे विशेषनाम नसून सामान्यनाम होय. तो द्राविड म्हणजे तेलुगु भाषेतील शब्द होय. त्याचा ढेरे यांनी केलेला विग्रह आणि अर्थ वस्तुस्थितीस धरून नाही. पर्यायाने 'कनुमारी'चा संबंध श्रीशैलम या क्षेत्रासी जोडता येत नाही.

■

३-४-१०१३/१९ बरकतपुरा, हैद्राबाद - ५०००२७

भाषावार्ता

साहित्य अकादमी, दिल्ली तर्फे विद्वान संशोधकांना "भाषा-सन्मान" हा पुरस्कार दिला जातो. इ.स.२००२ चा हा पुरस्कार ज्येष्ठ संशोधक डॉ. माणिकराव धनपलवार, हैद्राबाद यांना दि. २७-८-०३ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या एका विशेष समारंभात देण्यात आला. हा सन्मान मध्ययुगीन व प्राचीन साहित्य यांच्या विशेष अभ्यासाच्या संदर्भात दिला गेला आहे. परिषदेतर्फे डॉ. धनपलवार यांचे हार्दिक अभिनंदन! ■

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न शिक्षणसंस्थांत इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत मराठी भाषा सक्तीची करण्याच्या राज्यसरकारच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. ■

मुंबई येथे महाराष्ट्रदिनी 'मित्र-मराठी शाळांचे!' या मंचाची स्थापना करण्यात आली. ■

"शेवटी भाषेचं महत्त्व हे भाषिक कारणावरून नसतं. भाषेचं महत्त्व त्या भाषेचा समाज राजकीयदृष्ट्या किती सामर्थ्यशील आहे यावर असतं." - पृ. ४७

तुम्ही भाषेला राखाल तर भाषा तुम्हाला राखेल. जगातली सर्वांत मोठी 'आयडेंडिटी' आजही भाषेची समजली जाते. ही जर घालवली तर जगात तोंड दाखवायला जागा राहत नाही म्हणून भाषांतरकारांची धडपड त्या दिशेने असायला हवी. - पृ. ४९ ■

- भालचंद्र नेमाडे

(१ मे २००३ रोजी झालेल्या भाषांतरकारांच्या संमेलनातील समारोपाचे भाषण, 'केल्याने भाषांतर' जाने. - मार्च २००४)

हरिभाऊ आपटे यांचा साहित्यविचार आणि भाषाविचार

हे. वि. इनामदार

हरिभाऊ आपटे (१८६४-१९१९) यांचे साहित्य विपुल, विविध व वेचक आहे. दहा सामाजिक कादंबऱ्या, अकरा ऐतिहासिक कादंबऱ्या, दोन नाटके, एक नाट्यकथा, तीन अनुवादित नाटके, तीन अनुवादित प्रहसने, 'स्फुट गोष्टीं'चे चार भाग, दोन अन्य कथासंग्रह, काही व्याख्यानांच्या मुद्रित संहिता, चार स्वतंत्र कविता, चार अनुवादित कविता, तीन पुस्तकांना प्रस्तावना, पाच समीक्षा-लेख, सहा चरित्रे, एक विनोदी लेखसंग्रह, असे त्यांचे वाङ्मय-धन आहे. तसेच 'ज्ञानेश्वरीचा शब्दकोश' व 'महाभारताचा उपसंहार' (अपूर्ण) हे त्यांचे संशोधनपर लेखन आहे.

हरिभाऊंनी पुढील विषयांवर दिलेल्या व्याख्यानांतून त्यांच्या साहित्यमीमांसेचे स्वरूप समजून येते. त्यातूनच मराठी साहित्य, मराठी भाषा, भाषांतरे यासबंधींचे त्यांचे विचारही लक्षात येतात.

१. The Philosophy of Fiction
२. Realism in Fiction
३. The Teaching of Bhagavadgita
(Lectures delivered before the 'Friends' Literary Association,' poona, 1901)

४. हास्य
५. कादंबऱ्या
मुंबईस 'हेमंत व्याख्यानमाले'त दिलेली व्याख्याने (१९०२)

६. मराठी वाङ्मयाचा अभ्यास (ठाणे येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या दहाव्या वार्षिक समारंभाच्या वेळी दिलेले व्याख्यान, दि. २८ जून १९०३)
७. विग्दध वाङ्मय (मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या तेराव्या वार्षिक सभेपुढे दिलेले व्याख्यान) (दि. २६ नोव्हेंबर १९११)
८. महाराष्ट्र वाङ्मयाची उन्नती (अकोले येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून दिलेले व्याख्यान, १९१२)
९. Marathi : Its Sources and Development: (Wilson Philological Lectures. 1915)

त्यांनी आपला पहिला समीक्षा-लेख वयाच्या सतराव्या वर्षी लिहिला.

शेक्सपिअर, भवभूती व कालिदास' या संपादकीय लेखात केसरीकारांनी कालिदासाला काव्यगुणांच्या दृष्टीने शेवटचा क्रमांक दिला होता. हरिभाऊंना ते आवडले नाही. त्यांनी त्याविषयीचे आपले एक पत्र केसरीकडे धाडले. ते प्रसिद्ध करण्यात आले. "अप्राप्तकालवचन बृहस्पती जरी बोलला, तरी सुज्ञांत त्याचा अनादर होतो", याची हरिभाऊंनी आरंभीच आठवण करून दिली आहे. त्यानंतर त्यांनी कालिदासाचे काव्यसौंदर्य विशद केले आहे. आपल्या या पत्राच्या समारोपात हरिभाऊ लिहितात, " 'केसरी'ने आपल्या 'खरनखरांच्या झपाट्याने' कालिदासाचे कविकुलगुरुत्व ओढून घेतले आहे. हा लेख लिहिताना केसरीकार 'निद्राजननीच्या आधीन' असले पाहिजेत!" हरिभाऊ हे त्यावेळी चिपळूणकरांचे चहाते होते, हे लक्षात घेता, प्रस्तुत लेखातील बोचरा उपहास समजण्यासारखा आहे. हरिभाऊंची ही कालिदासप्रीती आपल्या 'भासकवीच्या नाट्यकथा' या पुस्तकास त्यांनी लिहिलेल्या प्रास्ताविकातही दिसून येते. "कालिदासाची कविता उद्यानलतेसारखी आहे" असे त्यांनी येथे म्हटले आहे.

शेक्सपिअरच्या 'रोमिओ अँड जूलिएट' व 'हॅम्लेट' या नाटकांच्या भाषान्तरावरील हरिभाऊंचे टीकालेख 'निबंधचंद्रिका' या मासिकात प्रसिद्ध झाले, त्यावेळी हरिभाऊ प्रीव्हिअसच्या वर्गात शिकत होते. "करुण पर्यवसानामुळे मनाला 'प्रमोदयुक्त खिन्नता' येते. सुख व दुःख ही बाह्यतः जरी निरनिराळी दिसतात, तरी त्यांचे आदिकारण एकच आहे. शिवाय नाटकातले दुःख हे सत्यच आहे, असे सर्वथा कधीही वाटत नाही. करुणरस - पर्यवसायी नाटकापासून आनंद होत नाही हे म्हणणे खोटे आहे. नाटक हे संसाराचे चित्र असल्यामुळे त्यात करुणरस - पर्यवसान संसाराप्रमाणे समर्थनीय आहे." - या शब्दांत हरिभाऊंनी शोकात्मिकेविषयी तात्त्विक चर्चा या लेखात केली आहे. मराठीत ट्रॅजिडी विषयीचे हे बहुधा पहिले विवेचन असावे. ('हरिभाऊ' : ल. म. भिंगारे, पृ.९१)

'हॅम्लेट' या नाटकाच्या भाषांतरावरील आपल्या नव्वदपानी टीकेत हरिभाऊंनी साहित्यविषयक पुढील प्रश्नांची चर्चा व्यापक भूमिकेवरून केली आहे. १. कविता, नाटक व टीका म्हणजे काय? २. स्वभाव - परिपोष ३. नाटकाची परिभाषा कशी असावी? ४. भाषांतर कसे असावे? ५. स्वतंत्र कथानक व आधारात्मक कथानक यांचे महत्त्व ६. आत्मगत भाषणे

'हॅम्लेट' हे पात्र विकाराच्या आहारी जाणारे नसून मुख्यतः विचाराच्या आहारी जाणारे आहे. म्हणून 'विकारविलसित' हे नाव देण्याऐवजी 'अति

विचारविलसित' असे म्हणणे शोभेल, हे आपले मत त्यांनी मांडले आहे.

'मधली स्थिती' ही हरिभाऊंची पहिली सामाजिक कादंबरी १८८५ मध्ये 'पुणे वैभव' या पत्रात प्रकरणशः प्रसिद्ध झाली. कादंबरीच्या पहिल्याच प्रकरणाबरोबर त्यांनी "कादंबऱ्यांचे उद्दिष्ट" हा आपला निनावी लेख प्रसिद्ध केला. त्यात ते सांगतात, "कादंबऱ्यांचा उद्देश मनोरंजन हा आहेच, पण त्याबरोबरच समाजाला सद्बोध करून, त्यास सन्मार्गास लावण्याचे सत्कार्य कादंबऱ्यांच्याकडून होणे जरुरीचे आहे." ('हरि नारायण आपटे यांचे संक्षिप्त चरित्र' : बा. मा. आंबेकर, पृ. २५)

"मराठीचा अभ्यास" या आपल्या व्याख्यानात हरिभाऊंनी वारकरी संतकवींची त्रोटक चरित्रे देऊन त्यांच्या कामगिरीचे विवेचन केले आहे. "विदग्ध वाङ्मय" या विषयावरील व्याख्यानांत, स्वतः हरिभाऊंच्याच साहित्य-संसाराचे यथार्थ वर्णन अप्रत्यक्ष आले आहे. "असताच्या भासांतून, परंतु सत्य आपणांस पुढे करावयाचे आहे. असताच्या निषेधाने सताची प्रगती करावयाची आहे," असा आपला दृष्टिकोण त्यांनी येथे मांडला आहे. "कादंबऱ्या" या विषयावरील आपल्या विवेचनात हरिभाऊंनी "कादंबऱ्या म्हणजे मोठ्या कथा" असे म्हटले आहे. ध्येयवादी, सौंदर्यवादी, भावनानिष्ठ आणि वास्तववादी अशा चार प्रकारांत त्यांनी कादंबऱ्यांचे वर्गीकरण केले आहे. "महाराष्ट्र वाङ्मयाच्या उन्नती" विषयी बोलताना त्यांनी उन्नतीचे चार उपाय सुचविले आहेत. मॅट्रिक्युलेशन परीक्षेपर्यंतचे सर्व शिक्षण मराठीतून व्हावे, विद्यापीठात मराठी भाषेचा समावेश एक आवश्यक विषय म्हणून व्हावा, मराठी कोशाची नवी संशोधित आवृत्ती तयार करावी आणि विविध भारतीय भाषांच्या सहकार्याने शास्त्रीय संज्ञांचा पारिभाषिक कोश तयार व्हावा, अशा सूचना त्यांनी केल्या आहेत.

वाङ्मयीन भूमिका

वाङ्मयीन टीका हे शास्त्र जेव्हा मराठी साहित्यात स्थिरपद झाले नव्हते, तेव्हा हरिभाऊंनी "विदग्ध वाङ्मय" या विषयाची तत्त्वचर्चा करावी आणि आपल्या स्वतःच्या ललित वाङ्मयाचे स्वरूपदर्शन घडवावे, हे विशेष लक्षणीय होय.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या तेराव्या वार्षिक सभेच्या दिवशी, म्हणजे दि. २६ नोव्हेंबर, १९११ रोजी हरिभाऊंनी "विदग्ध वाङ्मय" या विषयावर व्याख्यान दिले. तेच व्याख्यान, त्यात थोडी भर घालून दि. २३ डिसेंबर १९११ रोजी, स्वतंत्र पुस्तिकेच्या रूपाने त्यांनी प्रसिद्ध केले. त्यातील महत्त्वाचे विवेचन मननीय आहे.

"ज्यांस लोकशिक्षणाची इच्छा असेल त्यांनी, (काव्ये, कादंबऱ्या, नाटके वगैरे प्रकारांचीच पुस्तके वाचण्याची मनुष्यमात्रास जी आवड आहे त्या -) मनुष्य-स्वभावाचा फायदा घेऊन इष्ट कार्य घडवून आणावे. ते घडवून आणण्यास विदग्ध वाङ्मय हे फार उत्तम व महत्त्वाचे साधन आहे. मनुष्याची सदसद्विवेकबुद्धी जागृत करून त्यास मनुष्यत्वातून काढून देवत्वाकडे जाण्याबद्दल उत्सुक करून, त्या मार्गाला सन्मुख करणारे, असे जे कोणाचेही अंतःस्फूर्तीने शब्दरूप घेऊन मुखावाटे बाहेर पडलेले, किंवा लेखणीने लिहून ठेवलेले विचारोद्गार, त्या सर्वांना समुच्चयाने 'वाङ्मय' ही संज्ञा आहे."

"वाङ्मय हा शब्द फार व्यापक आहे. त्यातील एका विवक्षित भागाचेच थोडेसे पर्यालोचन करायचे आहे. तो भाग 'विदग्ध वाङ्मया'चा होय. 'विदग्ध' या शब्दाचा 'चतुर' असा एक अर्थ आहे. चातुर्याने केलेल्या कामात सौंदर्य दिसते. उपयुक्तता वाढते. या कौशल्यपूर्ण उपयोजनेस विदग्धता म्हणतात. हा साधारण अर्थ झाला. वाङ्मयाच्या संबंधात आणखीही काही विशिष्ट अर्थांचा समावेश केला पाहिजे."

"विदग्ध वाङ्मयात आणि शास्त्रीय वाङ्मयात फार फरक आहे. ज्यास आपण शास्त्र म्हणतो, किंवा इतिहास अथवा चरित्र म्हणतो, त्यात वैदग्ध्य हे मुख्यांग नव्हे, तर सत्य हे मुख्यांग होय. परंतु सत्य हे जेथे प्रधानांग धरले जात नाही, रचनाचातुर्य हे प्रधानांग धरले जाते, त्यात सत्याचा अपह्नव केला असला तरी कोणी दोष समजत नाही, असा एक वाङ्मयाचा भाग आहे. त्यासच मी विदग्ध वाङ्मय अथवा कलाप्रधान - चातुर्यप्रधान वाङ्मय असे नाव दिले आहे. त्यास साधारणतः 'ललित वाङ्मय' असे नाव दिले जाते. परंतु माझ्यामते 'ललित' या शब्दाने त्या वाङ्मयाच्या सत्य स्वरूपाचा पूर्ण बोध होत नाही. 'ललित' या शब्दात सौंदर्य, मार्दव, सौष्ठव इत्यादी गुणांनी युक्त असा इंग्रजीतील 'graceful' किंवा 'fine' या शब्दांचा अर्थ व्यक्त होतो. परंतु 'विदग्ध' या शब्दात जो अर्थ आहे असा माझा समज आहे, तो अर्थ 'ललित' या शब्दात किंवा इंग्रजीतील 'graceful', 'fine' वगैरे शब्दात येत नाही. इंग्रजीत ज्यास 'Belles letters' म्हणतात त्याला आपण 'ललित वाङ्मय' असे म्हणू; कारण 'सौंदर्यदर्शन', हा त्या वाङ्मयातला मुख्य गुण आहे. परंतु 'Artistic literature' या शब्दाची योजना ज्या वाङ्मय - विभागासंबंधाने करता येईल, तो वाङ्मय - विभाग, 'विदग्ध वाङ्मय' या शब्दांनी मी उद्दिष्ट करतो. यात पांडित्यास प्राधान्य नाही. चातुर्यास, वैदग्ध्यास प्राधान्य

आहे. या वाङ्मयात सत्यदर्शन हा प्रत्यक्ष हेतू नव्हे; परंतु सत्यदर्शन हा अप्रत्यक्ष हेतू असतो, हे मात्र विसरू नये."

"सत्य हा वाङ्मयाचा गुप्त हेतू. विदग्ध वाङ्मयात सत्य हे प्रच्छन्न, गुप्त, अप्रत्यक्ष असते; ते शोधून काढावे लागते. त्याच्या प्राप्तीचे मार्ग मात्र निर्दिष्ट केलेले असतात. ते कौशल्याने दाखविले जातात. सौंदर्याच्या आश्रयाने आनंद उत्पन्न करून, सत्याचा संचार मनुष्याच्या मनात करवून दिला जातो. तो या विदग्ध वाङ्मयाने होय. शर्करावगुंठित औषध आरोग्यदानासाठी जे करते, ते विदग्ध वाङ्मय सत्यप्रचारासाठी करते. त्याचा हेतू सत्यप्रचाराचाच. पण सत्य त्यास तळाशी ठेवावे लागते. प्रत्यक्ष हेतू निराळाच दाखवावा लागतो. तो हेतू कोणता? तर आनंदोत्पादन होय. मनाचे रंजन करावयाचे. आनंद जितका शुद्ध असेल, तितका श्रेष्ठ होय."

"विदग्ध वाङ्मय फार सामर्थ्यवान असते. याने नकळत परंतु फार प्रभाववान असा परिणाम, श्रोते, वाचक व प्रेक्षक यांच्या मनावर होतो. कवी व कथाकार वाचकांच्या अंतःकरणांवर हळूच हल्ला करतात; व ती आपल्या स्वाधीन करून घेतात." असे हरिभाऊंनी विवेचन केले आहे.

हरिभाऊंची भाषासमीक्षा

'विल्सन फायलॉलॉजिकल लेक्चरर' म्हणून मुंबई विद्यापीठाने १९१५ मध्ये हरिभाऊंची नेमणूक केली. 'मराठी : उद्‌गम आणि विकास' या विषयावर हरिभाऊंनी प्रस्तुत व्याख्यानमालेत इंग्रजीत सहा व्याख्याने दिली. त्यांचे विषय असे होते - १. प्राकृत भाषांची उत्क्रांती २. प्राकृत भाषा आणि अभिजात नाटके ३. महाराष्ट्री आणि मराठी ४. ज्ञानेश्वरपूर्व काळ आणि ज्ञानेश्वर-काळ ५. ज्ञानेश्वरीचा सर्वसाधारण अभ्यास (व्याकरण, अलंकार, इत्यादी) ६. ज्ञानेश्वर ते मोरोपंत. हीच व्याख्याने १९२२ मध्ये पुस्तकरुपाने प्रकाशित करण्यात आली.

हरिभाऊंचा वाङ्मयीन अभ्यास सूक्ष्म होता; पण त्यांच्या भाषाशास्त्रीय अभ्यासात सखोलपणा फारसा नव्हता. या व्याख्यानांची इंग्रजी भाषा व्यवस्थित व सुबोध आहे; पण त्यातील शास्त्रीय विवेचन वरवरचे व योजनाशून्य आहे. शब्दांची व्युत्पत्ती व भाषांची व्युत्पत्ती यांतील फरक स्पष्ट करण्यात आलेला नाही. केवळ उत्क्रांती - तत्त्वानुसार भाषेत बदल होत नाही. भाषा ही सामाजिक संस्था असल्यामुळे संमिश्र लोकव्यवहारांतून भाषिक व्यवहारांनाही वळण लागते, हे हरिभाऊंनी सांगितलेले नाही. पहिल्या दोन - तीन व्याख्यानांचा प्रपंच त्यांना एकाच

व्याख्यानात मांडता आला असता. त्यात मराठीच्या उत्पत्तीचे सोपपत्तिक विवेचन ते करू शकले असते. तसेच ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंतच्या मराठीच्या विकासाचे सोईनुसार विभाग पडून विवेचन करता आले असते.

आपल्या व्याख्यानात हरिभाऊंनी महानुभावीय सारस्वताचा अधिक समावेश करणे अगत्याचे होते. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम व मोरोपंत एवढे किमान चार टप्पे कल्पून, त्या त्या टप्प्यातील भाषिक कर्तृत्वाचा हिशेब घेणे अधिक सयुक्तिक ठरले असते.

या व्याख्यानमालेतील, 'ज्ञानेश्वरीचा सर्वसाधारण अभ्यास' हे पाचवे पुष्प त्यातल्या त्यात विशेष भरदार झाले आहे. हरिभाऊंनी स्वतःच केलेल्या ज्ञानेश्वरीच्या शब्दकोशाच्या आधारामुळे या व्याख्यानातील ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला थोडेफार महत्त्व प्राप्त झाले आहे. या व्याख्यानमालेतून मराठीच्या उद्‌गमाची कारणे आणि तिच्या विकासाची दिशा या विषयीचे सुसूत्र व सांग विवेचन आढळत नाही. त्यामुळे "हरिभाऊंचा हा विषय नव्हे, एवढे सिद्ध करण्यासच या व्याख्यानांचा उपयोग होतो," हे डॉ ल. म. भिंगारे यांचे मत यथार्थ वाटते. ('हरिभाऊ', पृ. ३५२)

समारोप

हरिभाऊंचा साहित्यविचार आणि त्यांची भाषिक समीक्षा यात बलस्थानांबरोबर थोडीफार शबलस्थानेही आढळतात, हे मान्य केले पाहिजे. पण ज्या काळात साहित्यमीमांसा, साहित्यसमीक्षा आणि भाषिक अभ्यास हे विषय मराठीत बाल्यावस्थेत होते, त्याकाळात हरिभाऊंनी आपल्या कुवतीप्रमाणे त्या विषयांचा उपन्यास केला, हे लक्षात घेतले पाहिजे; आणि त्यांचा शुभारंभ करण्याचे श्रेय त्यांना दिले पाहिजे.

हरिभाऊंनी आपल्या घरगुती व रससंपन्न शैलीतून वाचकांशी सुखसंवाद केले. या प्रतिभाशाली ललित लेखकाचे वाचकांशी सुखसंवाद केले. या प्रतिभाशाली ललित लेखकाचे लोभस व्यक्तिमत्त्व त्याच्या वाङ्मयीन कलाकृतीतून प्रगट झाले. मराठी रसिकांच्या या सहृदय सुहृदाचे मोज्चळ साहित्य म्हणजे एका उदार आत्म्याचे प्रगट चिंतन आहे, उन्मेषशाली प्रज्ञेचे ते विकसन आहे; आणि चैतन्यदायी प्रतिभेचे स्फुरण आहे. हरिभाऊंचा साहित्यविचार आणि त्यांचा साहित्यसंभार वाचकांना 'हरि' प्रवण करील यात शंका नाही.

■

६०/१५ भारतीनिवास कॉलनी, पुणे - ४११००४

मराठी भाषा शिकवणारा ग्रंथ

(Learning Marathi as a Foreign Language : Module 1, डॉ. नीती बडवे, अक्षर साहित्य, २०३५ सदाशिव पेठ, टिळक रस्ता पुणे., २००३, पृष्ठसंख्या १५५., मूल्य कॅसेटसह ३००रु. भारतात, २० डॉलर भारताबाहेर)

सुमन वेलवलकर

डॉ. नीती बडवे पुणे विद्यापीठाच्या विदेशी भाषा-विभागात जर्मन भाषेच्या प्राध्यापिका आहेत. जर्मनच्या पदवी आणि पदव्युत्तर वर्गांना शिकवण्याचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. जर्मन आणि अमेरिकन विद्यार्थ्यांना मराठी भाषा शिकवण्याचाही त्यांना पंधराहून अधिक वर्षांचा अनुभव आहे. या दुहेरी भाषाध्यापनामुळे भाषा शिकणाऱ्यांच्या नेमक्या अडचणींची त्यांना चांगली जाण आहे आणि आपले भाषावैज्ञानिक ज्ञान तसेच अध्यापनाची हातोटी यांच्या मदतीने त्यांतून मार्ग काढण्याचे कौशल्यही त्यांनी आत्मसात केले आहे. विशेषतः इंग्लिश / जर्मन आणि मराठी भाषांमधील उच्चार, वाक्यरचना आणि भाषेला लगटून असलेले सांस्कृतिक संदर्भ यांचा सखोल तौलनिक अभ्यास त्यांनी केला आहे.

आजवर मराठी भाषा शिकवणारी पंचवीसेक पुस्तके देशीविदेशी लेखकांनी लिहिली असली तरी सध्या सहज हाताळता येईल अशा पुस्तकाचा तुटवडा जाणवतो आहे. अशावेळी प्रामुख्याने लिपी, उच्चार आणि नामांची प्राथमिक ओळख करून देणारा पहिला भाग प्रा. बडवे यांनी कॅसेटची जोड देऊन प्रकाशित केला आहे. "परभाषेत एखाद्या आवडीच्या विषयावर लांबलचक सलग वर्णन लिहिणे फार सोपे आहे; परंतु विद्यार्थ्यांना माहीत असलेल्या शब्दांच्या मर्यादेत व्याकरणाचे दोन नियम समजावून देण्यासाठी एकमेकांशी असंबद्ध अशी आठ वाक्ये लिहिणे, ही अवघड गोष्ट आहे" असे ऑटो येस्पर्सन यांनी (लंडन १९०४-६१ पृ.१६) म्हटले आहे. एखादी परभाषा आरंभी शिकवणे किती जिकिरीचे काम आहे याची यावरून कल्पना यावी. प्रा. बडवे यांनी आपला सर्व अनुभव खर्ची घालून आणि बरीच

तोशीस सोसून काढलेल्या या पुस्तकाचे मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांनी आणि अध्यापकांनी स्वागत करायला हवे.

संकल्पित पाठ्यसामग्रीच्या ह्या पहिल्या पुस्तकात लेखिकेने प्रामुख्याने देवनागरी लिपी आणि मराठी उच्चार यांचा परिचय करून देत सर्व रफारांसह जोडाक्षरांपर्यंतचा पहिला टप्पा पूर्ण केला आहे. मराठी नामांची लिंगव्यवस्था, त्यांचे अनेकवचन, तू-मी-आम्ही यांची स्वामित्वदर्शक विशेषणे या प्राथमिक रचनांची क्रमशः ओळख करून दिली आहे. या पुस्तकात एकूण सहा पाठ आहेत. अनुक्रमणिकेत आणि प्रत्येक पाठाच्या आरंभी त्यात येणारा लिपीचा भाग, उच्चार आणि व्याकरण यांचा उल्लेख आहे. संबंधित भाग शिकवण्याच्या दृष्टीने योग्य प्रसंग, संवादात्मक रचना आणि त्याला दिलेली सांस्कृतिक संदर्भांची जोड पाहता लेखिकेने चहूबाजूंनी विचार केल्याचे जाणवते. उदाहरणच द्यायचे तर देवनागरीतील सुटे दंड असलेली अक्षरे ग, श आणि ण शिकवण्यासाठी "गणेशपूजा" हा समर्पक पाठ निवडला आहे.

विद्यार्थी रोमन लिपीच्या सवयीचे आहेत याचा लेखिकेने फार जागरूकतेने आणि सतत विचार केला आहे. देवनागरी ही उच्चारानुसारी लिपी अशा विद्यार्थ्यांना शिकवताना त्यांच्या प्रत्येक अडचणीकडे तिने लक्ष दिले आहे. देवनागरीने स्वर, व्यंजने, स्वरचिन्हे आणि संयुक्त व्यंजने (जोडाक्षरे) अशी व्यवस्था स्वीकारली आहे. रेषेच्या खाली अक्षरे आणि स्वरचिन्हाची जागा रेषेच्या वर, अक्षरापुढे किंवा अक्षराखाली असे तिचे दृश्य स्वरूप आहे. बाराखडी हे 'मराठी'चे खास वैशिष्ट्य आहे असे लेखिका म्हणते (पृ.११). परंतु हे वैशिष्ट्य 'मराठी'चे नसून 'देवनागरी'चे आहे. तसेच सर्व देशांना सामावून घेणाऱ्या या पुस्तकात "देवनागरी ही हिंदी आणि संस्कृत भाषेची लिपी आहे" (पृ.३१) या विधानात नेपाळी भाषेचाही समावेश असावा.

लिपी-शिक्षणाच्या वेगवेगळ्या पद्धती अध्यापक सोयीनुसार विद्यार्थ्यांच्या पार्श्वभूमीनुसार स्वीकारू शकतात. उदा. मराठी स्वभाषा असलेल्या मुलाला प्राथमिक वर्गात भाषेतले सर्व उच्चार फरकांसह ओळखता येत असतात आणि बऱ्याच प्रमाणात स्पष्ट करता येत असतात. अशांना त्या ध्वनींची रेखलेली रूपे ओळखायला आणि सुलभ मार्गाने रेखाटायला शिकवायचे असते. यावेळी लिपीतील अक्षरांचे आकारसाम्यानुसार लहान - सोपे, क्रमशः मोठे - अवघड गट पाडून शिकवल्यास फायदा होतो. उच्चार शिकवायचे नसल्याने लिपीच्या अध्यापनाचा

अर्धा भार कमी झालेला असतो. त्यामुळे लिपीच्या शिक्षणाची परंपरागत पद्धत मागे पडून मराठीच्या प्राथमिक पाठ्यपुस्तकांत आकारसाम्याची कास धरलेली असते.

प्रस्तुत पुस्तकाच्या लेखिकने थोडी वेगळी पद्धत अवलंबिली आहे. विदेशी विद्यार्थ्यांना जोडाक्षरांमध्ये येणाऱ्या समस्या लक्षात घेऊन मुळातच त्यांनी अक्षरांचे जोडाक्षरांच्या रचनेनुसार गट केले आहेत. प्रथम (तक्ता १ पृ.१४) अै, औसह स्वर आणि स्वरचिन्हे उच्चारांसह दिली आहेत. नंतर व्यंजनांची (पृ.१७) उजवा संलग्न दंड, मध्यभागी दंड, उजवीकडे सुटा दंड, शीर्षभागी छोटा दंड आणि दंड नसलेले एकमेव र अशी विभागणी आहे. अक्षरांची ओळख करून देताना लेखिका वारंवार मुख्य (main) व्यंजने, स्वर, अक्षरे असा शब्दप्रयोग करते. (पृ.११, १५, ५१, ५६ इ.) वास्तविक स्वर - व्यंजनांमध्ये, मुख्य आणि गौण अशी विभागणी कोणत्या तत्त्वावर करता येईल? उजव्या संलग्न दंडाची अक्षरे "बहुसंख्य" किंवा "अधिक" आहेत असे म्हणता येईल. पण ती "मुख्य" नाहीत. आधुनिक भाषाविज्ञानातील सर्व संकल्पना काटेकोरपणे वापरणाऱ्या लेखिकेने हा मोघम शब्द वापरायला नको होता. तक्ता २ (पृ.१५) मध्ये व्यंजने आणि जोडाक्षरांसाठी त्यांचे भाग दिले आहेत. त्यांनाही "अर्धे व्यंजन" (half consonant) न म्हणता "व्यंजनाचा तुकडा /हिस्सा / भाग (Part)" म्हटले असते तर ते अधिक शास्त्रीय झाले असते. कारण जोडाक्षरांमध्ये प्रत्येक ठिकाणी अर्धे व्यंजन नसते. मुळात संस्कृत परंपरेत व्यंजन हे स्वराशिवाय अपूर्ण मानले गेले आहे. मर्ढेकर म्हणतात,

कधी लागेल गा तुझे
नख माझिया गळ्याला
आणि सामर्थ्याचा स्वर
माझिया गा व्यंजनाला

व्यंजनात लेखिका म्हणते तसे 'अ' अध्याहृत मानायचे (पृ.३०-४) तर मग पृष्ठ १६ वरील काही हलन्त अक्षरांचा खुलासा काय? तो का दिला गेला नाही? "उद्‌गार" सारखे अनेक शब्द नेहमीच असे लिहिले जातात. ही बाब क्षुल्लक वाटली तरी रोमन लिपीच्या सवयीमुळे तिचाही खुलासा आवश्यक आहे.

जोडाक्षरे हा अंतिम टप्पा ध्यानात ठेवून, लेखिकेने देवनागरी लिपी शिकवण्याच्या दाखवलेल्या पायऱ्या या दृष्टीने प्रस्तावनेनंतर असलेले चार तक्ते अत्यंत उत्तम आहेत. त्यांची वर्गवारी, त्यांतले बारकावे उदा. न / न्‍ / ं (no/n), दोन 'च' चा फरक इ. पाहता गोंधळाला जागाच उरत नाही. बाराखडीच्या

दृष्टीने तक्ता ३ चा आराखडा तयार केल्याबद्दल लेखिकेचे अभिनंदन करायला हवे. बाराखडीची अशी मांडणी यापूर्वी कोणी केल्याचे पाहण्यात नाही. त्यातले विशिष्ट अक्षरांचे चौकोन, (रे ऐवजी ऱ्हस्व रु ला हवे?) र् + ऋ होत नाही म्हणून (-) ही तार्किक मांडणी खरोखरीच अनुभवाशिवाय, स्वतंत्रपणे विचार केल्याशिवाय शक्य नाही. जोडाक्षरांमध्ये विशेष जोडणी असलेली अक्षरे तक्ता क्र. ४ मध्ये दिली आहेत. तिथेही स्पष्टपणा आणि सुबोधपणा यांचा चांगला मेळ आहे. परंतु द + घ, द + ब + र, द + व + य, ड + ढ (प्रत्यक्ष उच्चारात असले तरी), ड + ट, ह + ण या भाषेत नसलेल्या जोडाक्षरांच्या बेरजा उच्चारदृष्ट्या अनावश्यक आहेत.

'र' ची जोडाक्षरे देताना (पृ.१३८) र्ग - ग्र / त्र हे चारपैकी दोनच प्रकार दिले आहेत. त्यांची ऋ - सृशी गल्लत करायची नाही ही स्पष्ट सूचनाही देण्यात आली आहे. परंतु र च्या चार प्रकारांमध्ये उरलेले दोन ड्र आणि ऱ्ह पृ.१४० वर दिले आहेत. या ठिकाणी र्ह आणि ऱ्ह, र्या / ऱ्या यांच्यातला भेद सांगणेही आवश्यक होते. ऋ हा अर्धस्वर व्यंजनासह मुख्यतः (mainly) संस्कृतमध्ये येतो हे लेखिकेचे विवेचन नेमके नाही. ऋ चे दोन्ही प्रकार (ऋतू / सृष्टी) केवळ संस्कृतमधूनच मराठीत आले आहेत. ते फक्त तत्सम शब्दांमध्येच असतात.

उच्चारणाचे तक्ते ५ आणि ६ यांमध्ये लेखिकेच्या जर्मन आणि इंग्लिश भाषेच्या ज्ञानाचा तिने उत्तम उपयोग करून घेतला आहे. उदाहरणे देताना प्रसिद्ध देशांची, शहरांची नावे, सामान्य वापरातले शब्द घेतल्यामुळे परभाषांमधले मराठीच्या बरेच जवळ येणारे उच्चार इथे सापडतात. परंतु तालव्य आणि दंत्य झ साठी 'झेब्रा' किंवा हिंदी 'बझार' न देता झेंडा / झोप ही जोडी अधिक योग्य ठरली असती. कारण हे शब्द सहज, वारंवार कानावर पडणारे आहेत. झेब्राचा उच्चार निर्विवादपणे एकसारखा होत नाही.

मराठीतील 'अ' चे लांबीप्रमाणे होणारे उच्चारही सूक्ष्म भेद दाखवणारे आहेत. बस - रस, गवत - हसत आणि वांगं - केळं यांची तुलना केल्यास अनुक्रमे प्रत्येक गटात पहिला, दुसरा आणि शेवटचा अधिक ठळकपणे लक्षात येणारा दीर्घ अ आढळतो. तिसऱ्या गटाशिवाय सर्व शेवटचे अ इतके तोकडे असतात की हे शब्द व्यंजनान्त म्हणता येतात. ही मराठीची स्वाभाविक प्रकृती आहे. तीच गोष्ट ष आणि श ची. "मराठीत फक्त सुधीर फडके आणि अरविंद मंगरूळकर ष आणि श फरक कळण्याइतके स्पष्ट उच्चारतात" असे डॉ. ना. गो. कालेलकर

म्हणायचे. सूक्ष्मपणे ऐकल्यास संस्कृतज्ञ, संस्कृतउच्चाराग्रहींच हा भेद करतात. मराठी बोलणाऱ्यांच्या संख्येच्या तुलनेत ही संख्या फारच कमी आहे. (ष 'भाषे'तच असल्यामुळे अक्षर रूपात टिकून आहे.) असे असता लेखिकने पहिल्याच पाठात सुषमा, अमेय (अखेरचा अपवादरूप दीर्घ 'य') ही अवघड उच्चाररूपे कशासाठी निवडली? सुधा - अभय चालले असते. तरीही साधारणपणे सर्व उच्चारांबाबत, विशेषतः इंग्रजी - मराठी 'फ' च्या उच्चारणाचा दिलेला खुलासा (पृ.४९) आणि जागोजागी अचूक उच्चारणांच्या जोडीला कॅसेट पुरवल्यामुळे मराठी उच्चार शिकणे सुरळीत झाले आहे हे जाणवते. खरेतर मराठीतच 'फ'चा उच्चार ओष्ठ्य न करता इंग्रजीप्रमाणे दंत्योष्ठ्य करण्याची फॅशन अगदी दूरदर्शन पासून रूढ होताना दिसते. कॅसेटमध्येही फाटक, जाफना यांचे उच्चार तसेच आहेत. असे असूनही कॅसेटमधले उच्चार आणि पुस्तकातले अक्षर यांचा मेळ घातल्यामुळे स्वयंअध्ययनासाठी ही पाठ्यसामग्री विशेष उपयुक्त आहे.

उच्चार शिकवताना जवळच्या उच्चारांमधला फरक ओळखण्याच्या दृष्टीने, कान तयार करण्याच्या बाबतीत 'लघुतम युग्मांचा' ('minimal pair) उपयोग होतो. लेखिकेने असे सराव दिले असल्याबद्दल म्हटले आहे. (पृ.१०) त्यातही पूर्णतः नवे उच्चार करायला अनुकरणाचे सराव द्यावे लागतात. उलट घोटाळा होईल असे जवळचे ध्वनी हे शिकणाऱ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीनुसार वेगळे असतात. इंग्लिश भाषकांसाठी अल्पप्राण आणि महाप्राण ध्वनी समस्येचे असतात. परंतु त्यांचा ट आणि ड मध्ये घोटाळा होण्याचे कारण नाही. हे दोन्ही स्वतंत्र ध्वनी त्यांच्या भाषेत आहेत. त्यामुळे ट - डची लघुतम युग्मे (पृ.१०४) देण्याची गरज नव्हती. शिवाय जिथे ती दिली आहेत तिथे सर्व लघुतम युग्मे नाहीत. उदा. कुशल - कुसळ, आण - कान, गणेश - दिनेश (पृ.६२). १०४-५-६ वरील जोड्यांमध्ये फारच कमी जोड्या लघुतम युग्मे आहेत. फरक कळण्यासाठी अडचणीचे उच्चार शेवटी असले तर ते अस्पष्ट ऐकू येतात. अशी व्यंजने शब्दाच्या आरंभी, मध्ये, स्वरान्त (आ-ई इ.) असावीत. उच्चारांच्या स्वाध्यायात लघुतम युग्मांचा उपयोग 'फरक ओळखण्यासाठी' (Discrimination) अधिक चांगला असतो. चाचणीच्या दृष्टीने तो प्रश्न अधिक नेमका असतो. असे प्रश्न या पाठ्यपुस्तकात नाहीत. सदर पाठ्यसामग्रीत पुस्तकातले शब्द कॅसेटच्या लांबीच्या मर्यादेमुळे गाळण्यात आले आहेत हे समजण्यासारखे आहे. परंतु ऐकलेल्या शब्दावर पुस्तकात खूण करा या प्रश्नात शार, शोर, ढाक (अर्थ ?); सड, दडी (द्वितीय भाषा शिकणाऱ्याच्या दृष्टीने

वापर?) (पृ.१०९) कशासाठी दिले हे समजत नाही. छ - ख, ख - भ हे ध्वनिभेद घोटाळ्याचे नाहीत. घार - धार ही दृश्यरूपात घोटाळा होऊ शकेल अशी जोडी आहे. शास्त्रीय बैठकीवर पाठ्यसामग्री बनवताना अशा बाबतीत काळजी घेतली पाहिजे.

मुख्यत्वे लिपी आणि उच्चार यांवर भर देणाऱ्या या पहिल्या भागात प्राथमिक वाक्यरचना आणि प्रारंभिक जुजबी व्याकरण येणे स्वाभाविक आहे. मराठीतील नामांची व्याकरणिक तीन लिंगे, त्यांचे एकवचन आणि अनेकवचन; मी - तू - आम्ही या सर्वनामांची स्वामित्वदर्शक विशेषणे आणि शीक, बोल, खेळ इतपतच क्रियापदांची ओळख हे या पुस्तकातले प्रमाण योग्य आहे. वारंवार वापरल्या जाणाऱ्या (frequent) नामांचे लिंगाच्या गटाप्रमाणे होणारे अनेक वचन आणि सामान्य रूप यांचा तक्ता पृ. १३ वर देण्यात आला आहे. त्यांची विभागणी जरी अंत्यवर्णानुसार देण्यात आली असली तरी क्रम एकसारखा नाही. पुल्लिंगी नामे व्यंजनान्त - आ -ई - ऊ अशी आहेत. त्यांत इंग्रजीतून मराठीत आलेले फोटा-रेडिओसारखे frequent शब्द नाहीत. हा क्रम स्त्रीलिंगी नामांमध्ये न पाळता आकारान्त - ई - व्यंजनान्त १ - २ असा आहे. नपुंसकलिंगी नामांमध्ये पाणी - लोणी-दही या frequent नामांचा तसेच लिंबू - वासरू या ऊकारान्त नामांचाही गट नाही. नपुंसकलिंगी नामांच्या एकारान्ती / अकारांती रूपांविषयीही लेखिकेने पृ. ९८ वर दिलेला खुलासा गोंधळात टाकणारा आहे. पण पुढे पृ.१४५ वर दिलेला खुलासा मात्र योग्य आहे. उदाहरणे देताना 'गुरू' (frequent?) देण्यापेक्षा चेंडू (१) / लाडू (२) / भाऊ अशी पुढे ओळख होणाऱ्या शब्दांची द्यावीत. एकूणच या तक्त्यात m - 6, fl - 4 4, n - 2 अशी वर्गवारी करण्यापेक्षा अंत्यवर्णांच्या एकाच क्रमानुसार देणे योग्य ठरले असते. विद्यार्थ्याला m१ व्यंजनाना f१ आकारान्त हे क्लिष्ट संदर्भ पुन्हापुन्हा तक्त्यात पाहून तपासावे लागले नसते. डॉ. विजया चिटणीस यांच्या An Intensive Course in Marathi या पुस्तकात (CIIL जुलै १९७९ प.आ.) अनेक वचनांचे तक्ते अंत्य वर्णनानुसारच पृ.२८, ५८, ९५ या ठिकाणी आणि सामान्यरूपांचे तक्ते १३२, १५२, १७४ या ठिकाणी देण्यात आले आहेत.

दुसरी गोष्ट प्रा. बडवे हा, ही, हे यांना उपपद (article) मानतात (पृ.५९). या मुद्द्यावरही मतभेद होऊ शकतो. इंग्रजीतील a, an, the प्रमाणे ही article नाहीत. त्यांची वर्गवारी दर्शक सर्वनामे / विशेषणे यांमध्ये केली जाते. त्यांच्या जोड्या देताना केवळ पुल्लिंगी एकवचनी हा / तो भिन्न स्वरान्त आहेत. हे वेगळेपण

लक्षात आणून देण्याचा बारकावा स्तुत्य आहे. वर्तमानकाळात कर्त्याच्या लिंगाप्रमाणे क्रियापदाचे रूप फक्त एकवचनात असते ही साधी पण अतिशय उपयुक्त सूचना (पृ.१४६) विद्यार्थ्यांना नवी वाक्ये बनवताना उपयोगी पडणारी आहे.

लिपी-उच्चार यांचे क्रमशः टप्पे बनवून व्याकरणाचा एखादा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी पाठ लिहिताना बरीच कसरत करावी लागते; हे आपण येस्पर्सनच्या पूर्वोक्त मतात पाहिले आहे. यानुसार पहिला पाठ नमस्ते (परिचय) नंतर गणेशपूजा,एक आणि अनेक (देश, भाषा, शहरे), अवयव (नामांचे एक वचन आणि अनेक वचन), घर आणि शाळा (स्वामित्वदर्शक विशेषणे) ही आखणी व्यवस्थित आहे. परंतु दुसरी भाषा शिकणारे विद्यार्थी साधारणपणे प्रौढ असतात. त्यांच्यासाठी कमळ हे एक फूल आहे, डोकं हा एक अवयव आहे, हे दोन ओठ - एक तोंड अशी वाक्ये वापराच्या दृष्टीने उपयोगी वाटत नाहीत. आरंभी केवळ अवयवांची नावे समजून काय फायदा? कधी काही दुखत असल्यास डॉक्टरांकडे जाताना त्यांची गरज वाटणार. भाषाशिक्षणाच्या पाठ्यसामग्रीत शिकणाऱ्याची गरज लक्षात ठेवून मजकूर घ्यावा लागतो. यम, नस (पृ.४८) असे शब्द ते कुठे वापरतील? त्यांच्या दृष्टीने निरुपयोगी असे शिकवून अध्यापनातला वेळ आणि शक्ती दोन्ही फुकट जाते.

पाठ्यसामग्रीतील मजकूर, वर्णने साधारणपणे प्रातिनिधिक असावीत असा एक संकेत आहे. 'घर' या पाठात मागे दूर एक कारखाना, त्याचं धुराडं, त्यातला धूर दाखवण्याचं प्रयोजन काय? धुराडं हा घराचा अविभाज्य भाग असलेल्या युरोपियन विद्यार्थ्यांचा त्यामुळे गैरसमज होण्याची शक्यता आहे. तसेच या पाठातला मुलगा (एकुलता एक असावा) बाग- बंगलीवजा घरात राहूनही आपली खोली गॅरेजमध्ये का दाखवतो? हे चित्र प्रातिनिधिक नाही. सहाव्या पाठात 'ऑ' ची ओळख करून दिली आहे. पण पाठ शाळेचा आहे. तो कॉलेजविषयी अधिक योग्य झाला असता. ॲन शाळेचा उल्लेख "मी इथे मराठी शिकते" असा करते. शाळेत परकीयांना मराठी शिकवत नाहीत. "मी मराठी शिकते" इतके पुरेसे होते. (कॅसेटमधला ॲनचा आवाजही विदेशी मुलीचा नाही ही एक नोंद!)

पुस्तकात दिलेली चित्रे रंगीत नसली तरी सुबक आहेत. पृ. ८९ वरील चित्राने फक्त 'हात' सूचित न होता 'तळहात' सूचित होतो हे लक्षात आणून द्यावेसे वाटते. काही चित्रांनी सांस्कृतिक आशयात चांगली भर घातली आहे. (पृ.५९, १२३) परंतु पृ. ११२ वर "इथे खूप झाडं आणि फुलं आहेत" या वर्णनाशी चित्राचा मेळ नाही.

संपूर्ण पुस्तकात अनवधानाने पुन्हा पडलेला Text2 हा क्रमांक (पृ.१३४) आणि मी बालते (बो - पृ.१४९) इतके सूक्ष्म मुद्रणदोष हा पुस्तकाचा एका परीने तांत्रिक निर्दोषपणाच मानावा लागेल. पुस्तकाच्या निर्मिति - मूल्यात लेखिका आणि प्रकाशक यांनी कुठेही आखडता हात घेतला नसल्याचे जाणवते. पण त्याचीच दुसरी बाजू म्हणून केवळ लिपी-उच्चार - प्राथमिक नामांपुरते हे पुस्तक (कॅसेटसह) काहींना ३०० रुपये / वीस डॉलर या किमतीत महाग वाटण्याची शक्यता आहे.

या पुस्तकाची उपयुक्तता केवळ शिकणारांसाठीच आहे असे नाही. परभाषकांना मराठी भाषा शिकवणाऱ्या अध्यापकांच्या दृष्टीने हे पुस्तक अतिशय महत्त्वाचे आहे. ते जसे आहे, तसे वापरावे म्हणूनही नाही; तर लेखिकेने अध्यापनात जागोजागी किती बारकावे नोंदवले आहेत त्यांचा अभ्यास करण्यासाठीही हे पुस्तक अभ्यासकांनी अवश्य सूक्ष्मपणे वाचावे. उदा. मुंबई आणि मार्ग या रेषांवरील समान चिन्हांत गल्लत होऊ द्यायची नाही या सूचनेमागे अनुभव आहे. अध्यापकांनी अभ्यासण्याचा या पुस्तकातला महत्त्वाचा भाग म्हणजे त्यातले स्वाध्याय. लिपीच्या स्वाध्यायांचे इथे तेरा प्रकार पाहायला मिळतात. कॅसेट ऐकून ओळखण्याच्या प्रश्नांसाठी ही खूण, वाचून उत्तरे लिहिण्याच्या प्रश्नांना किल्लीची खूण, तीन चाचण्या, सर्वांची शेवटी दिलेली उत्तरे यांमुळे हे स्वयंअध्ययन पायाशुद्ध होते.

शब्दार्थ देताना सामान्य पद्धत सोडून पाठात येणारी प्रत्ययांसह रूपे दिल्यामुळे आम्ही, मी नंतर 'खेळतो' चा अर्थ plays (पृ.१३५) असा येतो. 'नाना' चा अर्थ हिंदीप्रमाणे आईचे वडील (पृ.४१) मराठीत नाही. अशावेळी कोशातली, त्या त्या भाषेतली रूपे देणेच श्रेयस्कर असते. स्त्री-पुरुषांची नावे देताना girl's given name इतका लांब खुलासा न करता नावाचे आद्याक्षर इंग्रजीप्रमाणे capital देऊन पुढे M / F द्यावे. मराठी नाव नुसते वाचून मुलीचे की मुलाचे हे अमेरिकन किंवा युरोपियन लोकांना सहज कळत नाही. त्यासाठी हा व्यवहार्य तोडगा सुचविला आहे.

साकल्याने विचार करता भरपूर सराव, सूक्ष्म बारकावे लक्षात आणून देणारी स्पष्टीकरणे, चाचण्या, त्यांची उत्तरे या सर्वांसह या पुस्तकाची रचना अनुभव आणि बुद्धिमत्ता या दोन्हींची साक्ष देणारी आहे. पहिल्या भागातच दुसऱ्या भागाविषयीचे आश्वासन उत्सुकता वाढविणारे आहे हे निश्चित.

■

२ / एफ-४४, सुंदरनगरी, ३०८, सोमवार पेट, पुणे ४११०११

टाळ्यांची बोलकी भाषा

विजया देव

वरळीच्या नेहरू सेंटरमध्ये एक विशेष कार्यक्रम होता. कोलंबिया अंतराळ-यानातील एक प्रवासिनी कल्पना चावला हिंच्याविषयी 'नासा'ने तयार केलेल्या डिव्हीडींचा संच नेहरू तारांगणाला भेट देण्याचा हा कार्यक्रम. या अंतराळयानाला पृथ्वीवर परतताना अपघात झाला आणि त्यात सर्वच अंतराळवीरांचा अंत झाला. कल्पना चावला त्यांपैकी एक. पण अशा दुर्घटनांमुळे साहसीवृत्तीचा लोप होऊ नये आणि अवकाश मोहिमा चालू राहाव्यात हा विचार पुढे नेण्यासाठी काही व्यक्ती पुढे आल्या होत्या. त्या म्हणजे यांपैकी दोन अंतराळवीरांच्या पत्नी, त्यांपैकी एकीचा मुलगा आणि या मोहिमेचा सचिव. व्यासपीठावर वरील कार्यक्रमासाठी हे चौघे हजर होते.

प्रसंग गंभीर होता. व्यासपीठावरील सर्वांनी आपले जवळचे माणूस या मोहिमेत गमावले होते. कल्पनाच्या स्मृतीही त्यांच्या मनात ताज्या होत्या. त्या आठवणींना आणि त्या भीषण घटनेला इथे उजाळा मिळणार होता.

म्हणून सूत्रसंचालकांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला सांगितले की या प्रसंगावर दुःखाचं सावट आहे, त्यामुळे श्रोत्यांना जरी कल्पना चावला व इतर अंतराळवीरांच्या धाडसी वृत्तीचं कौतुक वाटलं तरी आपल्या भावना श्रोत्यांनी काबूत ठेवाव्या, टाळ्या वाजवून त्या व्यक्त करू नयेत.

श्रोतृवर्गात एका नावाजलेल्या शाळेचा विद्यार्थिवर्ग, शिक्षक आणि या विषयात - कार्यक्रमात रस असलेले अन्य लोक उपस्थित होते. मी त्यांच्यापैकीच एक होते. सुरुवातीचा काही वेळ या सूचनेचं पालन झालंही, पण उशिरा आलेल्या श्रोत्यांना या आवाहनाची कल्पना नव्हती. त्यामुळे कल्पना चावलाबद्दलचे गौरवोद्गार, अंतराळवीर-पत्नींचा मोहिमेबद्दलचा निर्धार, कल्पनाच्या डिव्हीडी नेहरू तारांगणाकडे सुपूर्द करणं अशावेळी श्रोत्यांनी टाळ्यांचा गजर केला. ती एक सामूहिक, उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती. प्रसंग आनंदाचा निश्चितच नसला तरी अभिमानाचा होता.

सार्वजनिक कार्यक्रमात टाळ्या वाजवण्यातून अनेक भावना व्यक्त होत असतात. याच मार्गातून श्रोते आपल्या भावनांना, प्रतिक्रियांना वाट करून देतात. याच कार्यक्रमाचं उदाहरण घ्या. आपल्या नवऱ्याचा, वडिलांचा भीषण अंत झालेला असला तरी ते दुःख मागे सारून हे आप्त अवकाश मोहिमांचं काम चालू राहावं हे सांगायला पुढे आले होते. त्यांनी पाहिलेल्या कल्पना चावलाबद्दल जिव्हाळ्यानं बोलत होते. यात मनानं सहभागी झालेले श्रोते टाळ्या वाजवून भावनिक समरसता दाखवत होते. कधीकधी भावनेच्या फार सूक्ष्म छटाही टाळ्यांमधून व्यक्त होतात. टाळ्यांमधून काही फक्त आनंदच व्यक्त होतो असं नाही. टाळ्यांमधून किती वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिसादाला वाट मिळते याबद्दलचा आणखी एक प्रसंग आठवतो.

एका पुस्तक प्रकाशनाचा समारंभ. श्री. प्रभाकर कुंटे यांच्या 'माझे जीवन राजकारण' या आत्मचरित्राचे प्रकाशन. श्री. कुंटे यांनी राजकारणातच सर्व आयुष्य वेचल्यामुळे हॉलमध्ये शेकडो राजकीय - सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती. बहुसंख्य तरुण पिढीचे स्त्रीपुरुष हे विशेष. व्यासपीठावरही बरीच मंडळी आणि कार्यक्रम लांबत चाललेला. त्यात एक अत्यंत वयोवृद्ध गृहस्थ गौरवपर बोलायला उभे राहिले. तेही स्वातंत्र्यपूर्व काळापासून देशहितासाठी झटणारे, तळमळीचे कार्यकर्ते. त्यांच्या नावाचा दबदबा आताच्या तरुण पिढीवरून पूर्ण ओसरलेला. पण वडीलधारी, कुंटयांच्या बरोबरीची व्यक्ती म्हणून मानाचे स्थान. ते बोलायला उभे राहिले ते काळवेळेचे भान विसरून बोलत राहिले. त्यांचा थकलेला, ओढणारा आवाज, अप्रस्तुत किरकोळ तपशील यांमुळे श्रोत्यांनी कंटाळून हळूहळू टाळ्यांचा गजर करायला सुरुवात केली. वक्ते तसे खंदे कार्यकर्ते. त्यामुळे त्यांनी हा संदेश ओळखूनही आपली लांबण चालूच ठेवली. श्रोत्यांच्या सहनशक्तीनं मर्यादा ओलांडल्यावर पुन्हा टाळ्या. चुळबुळ आणि अस्वस्थता यांची बोलकी प्रतिक्रिया. शेवटी वक्ते खाली बसले.

कार्यक्रम पुन्हा रुळावर आला. बाकीचे गौरव, सत्कार, प्रकाशन वगैरे सोपस्कार झाल्यावर काही ज्येष्ठ व्यक्तींचे कृतज्ञतापूर्ण सत्कार करण्यात आले. त्यात या वक्त्यांचा सत्कार झाला आणि काय आश्चर्य! टाळ्यांनी सभागृह पुन्हा एकदा दुमदुमलं. यावेळी भावना पूर्ण वेगळी. त्यात काय काय ध्वनित होतं होतं? त्या ज्येष्ठ व्यक्तीबद्दल आदर आणि आधीच्या टाळ्यांविषयी खेद. जणू श्रोते म्हणत होते, तुमच्या त्यागाबद्दल, कार्याबद्दल आमच्या मनात आदर आहे, पण मघाशी

तुम्ही जे भाषण केलंत ते रटाळ होतं. त्याबद्दल नापसंती जरूर आहे. मात्र त्या टाळ्यांबद्दल आम्हाला माफ करा. कराल ना? माफीचा सूर, ज्येष्ठांचा मान राखणं, कर्तृत्वाची जाणीव या भावना व्यक्त करणाऱ्या, बराच काळ वाजणाऱ्या टाळ्या हा त्या कार्यक्रमाचा एक मानबिंदू होता.

■

९ प्रिया, ९ वरळी सीफेस, मुंबई - ४०००३०

साद आणि प्रतिसाद

'कानडा विठ्ठलू' या चर्चेचे संदर्भ

शकुंतला क्षीरसागर

डॉ. प्रा. सुधीर रसाळ यांचा 'कानडा विठ्ठलू' हा लेख 'भाषा आणि जीवन'च्या वर्ष २०, अंक १, हिवाळा २००२ च्या अंकात प्रकाशित झाला आहे. त्यानंतर 'भाषा आणि जीवन'च्या अंकात साद आणि प्रतिसाद या सदरात प्रा. डॉ. म. अ. मेहेंदळे, श्री. नारायण शंकर आपटे आणि प्रा. डॉ. द. दि. पुंडे यांची टिपणे प्रकाशित झाली आहेत.

याच विषयावर सुमारे २५ वर्षांपूर्वी चर्चा झाली होती असे स्मरत होते म्हणून शोध घेतला तेव्हा असे आढळले की, सुप्रसिद्ध संशोधक भा.पं. बहिरट आणि प. ज्ञा. भालेराव यांच्या 'वारकरी संप्रदाय : उदय व विकास' या ग्रंथाचे ना. ग. जोशी यांनी केलेले परीक्षण 'सत्यकथे'च्या मार्च १९७७च्या अंकात पृ. ५५ ते ५७ वर प्रकाशित झाले आहे. त्या परीक्षणाच्या निमित्ताने प्रभा गणोरकर यांचे ''कर्णाटकू विठ्ठलू' एक टिपण सत्यकथेत जुलै १९७७च्या अंकात पृ.५७ वर प्रकाशित झाले. त्यावर पंडित आवळीकर आणि मधुकर वाकोडे यांची चर्चा सत्यकथेतच जानेवारी १९७९च्या अंकात पृ. ३३ - ३६ वर प्रकाशित झाली. त्यानंतर सुमारे दीड वर्षांनी म्हणजे मे १९८० च्या सत्यकथेत 'पुन्हा एकदा कर्णाटकू विठ्ठलू' चर्चा या नावाने नलिनी विष्णुपंत पाध्ये, म. सु. पाटील, विश्वनाथ खैरे यांची टिपणे पृ. ४६ वर प्रकाशित झाली आहेत. जिज्ञासू अभ्यासकांच्या माहितीसाठी हे संदर्भ दिले आहेत.

■

संस्कृतभाषेतील 'संख्यावाचके'

गीता केतकर

संख्यादर्शक शब्दाला व्याकरणाच्या परिभाषेत 'संख्यावाचक विशेषण' म्हणतात. त्यांच्या साहाय्याने संख्यांचे शब्दांकन केले जाते.

'एक' ते 'चार' या संख्यावाचकांची इतर शब्दांप्रमाणे (देव, माला इ. शब्दांप्रमाणे) विभक्तिरूपे तयार होतात. अर्थात 'वचन' हे त्या संख्येनुसार ठरते. उदाहरणार्थ 'एक' शब्दाची सर्व विभक्तिरूपे (सप्तमीपर्यंत) एकवचनीच असतात. 'द्वि' या संख्यावाचकाची सर्व विभक्तिरूपे द्विवचनीच असतात आणि 'त्रि' व 'चतुर्' या संख्यावाचकांची विभक्तिरूपे बहुवचनी असतात. 'एक' ते 'चतुर्' हे शब्द तिन्ही लिंगांत वेगवेगळे चालतात.

पञ्च' पासून 'नवदशन्' (१९) पर्यंतचे शब्द एकाच प्रकारे चालतात.

'विंशति' (२०) पासून पुढची सर्व संख्यावाचके एकाच प्रकाराने वापरली जातात.

संवत्सराचा म्हणजेच सनाचा उल्लेख करतानाही एक विशिष्ट पद्धत वापरली जाते. संख्यावाचक विशेषणांच्या मदतीने एखाद्या सनाचा निर्देश करताना त्या सर्व संख्यावाचकांचा एकचएक असा समास तयार केला जातो. उदा. 'दशनवैकतमे संवत्सरे'. 'दशनवैक' ही संख्या अंकांत लिहिताना किंवा मराठीत तिचे रूपांतर करताना 'उजवीकडून डावीकडे' या क्रमाने त्या सामासिकपदाचा अर्थ लावला जातो. म्हणजे '**दश**<u>न</u>*वैक*' यातील -

'*एक*' या पदाने १ हा अंक मिळतो.

'<u>नव</u>' या पदाने ९ हा अंक मिळतो.

'**दश**' या पदाने १० हा अंक मिळतो.

हे अंक एकत्रितपणे मांडले की १९१० (एकोणीसशे दहा) हा सन मिळतो.

श्री. कृष्ण वामन चितळे या विद्वान लेखकाने सन / संवत्सराचा निर्देश करण्यासाठी एक आगळीच पद्धत वापरली आहे.

'लोकमान्यटिळकचरितम्' या आपल्या संस्कृतातून लिहिलेल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत भाषेत रूढ असलेल्या संख्यावाचकांचा वापर न करता अत्यंत सूचकतेने

एका सनाचा निर्देश त्यांनी केला आहे. श्री. चितळे लिहितात - "जीवनयात्रायां लब्धावसरो धीमद्भिः काव्यशास्त्रविनोदेन नीयते इति श्रूयते । मया सांप्रतं किं कर्तव्यमिति विचारे समुत्पन्ने वृत्तपत्रमुद्रिता वार्ता नयनगोचरतां गता यद्रिपुभूतग्रहभूमिते संवत्सरे लोकमान्यटिळकमहाशयानां जन्मशताब्दीमहोत्सवो भविष्यतीति ।"

प्रस्तुत वाक्यातील अधोरेखित शब्द हा सननिर्देशक आहे. त्यात येणाऱ्या 'रिपु-भूत-ग्रह-भूमि' या शब्दांची योजना अंकांच्या उल्लेखासाठी मोठ्या खुबीने केलेली आहे. भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती, ज्योतिषशास्त्र इ. अनेक विषयांचा आधार त्या शब्दांना आहे. कसा? ते पुढील स्पष्टीकरणातून लक्षात येईल.

रिपु - भारतीय तत्त्वज्ञानात मनुष्याच्या मनात उत्पन्न होणाऱ्या षड्विकारांना षड्रिपु (षड्रिपु) म्हटले आहे. साधकाच्या मोक्षमार्गातील त्याचे जणू 'सहा' शत्रूच.

काम- क्रोध - लोभ - मद - मोह - मत्सर हे ते षड्रिपु होत.

म्हणून येथे 'रिपु' शब्द ६ हा अंक सूचित करतो.

भूत - विश्वाच्या उत्पत्तीचा शोध घेताना, 'ही सृष्टी किंवा हे विश्व पंचमहाभूतांपासून बनलेले आहे.' असा सिद्धांत भारतीय तत्त्ववेत्त्यांनी मांडला आहे. ही पाच महाभूते -

पृथ्वी - आप् - तेज - वायु - आकाश. तेव्हा 'भूत' या संज्ञेने येथे ५ या अंकाचे सूचन होते.

ग्रह - भारतीय ज्योतिर्विदांनी - खगोलशास्त्रज्ञांनी आकाशस्थ ग्रह एकूण 'नऊ' मानले आहेत.

"रविः सोमो भौमसौम्यो गुरुः शुक्रः शनैश्चरः ।
राहुः केतुश्च गगने ग्रहा नव चराचराः ॥"

तेव्हा येथे 'ग्रह' शब्द ९ अंकाचा निर्देशक ठरतो.

भूमि -आपणा सर्व पृथ्वीवासियांची एकचएक अद्वितीया माता म्हणजे भूमाता अशी भारतीयांची विचारसरणी आहे.

म्हणून 'भूमि' हा शब्द १या अंकाचे प्रतिनिधित्व करतो.

रिपुभूतग्रहभूमि - या पदापासून मिळालेले अंक

↓ ↓ ↓ ↓

६ ५ ९ १

आता हे ‘उजवीकडून डावीकडे’ वाचत गेल्यास मिळणारी संख्या - १९५६

१९५६ हे वर्ष लोकमान्य टिळकांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे केले गेले. त्या निमित्ताने हे संस्कृत भाषेत रचलेले ‘लोकमान्यटिळकचरितम्’ त्या वर्षी प्रकाशित केले गेले.

■

८, म्हात्रे अपार्टमेंट, गोपी टॉकीज जवळ,
नाना शंकरशेट रोड, विष्णुनगर, डोंबिवली (पश्चिम)

दहावी-बारावीमध्ये मराठीत नापास होणाऱ्यांचे वाढते प्रमाण

मराठी भाषेचे भवितव्य काय असेल यावरची चर्चा काही आता नवी राहिलेली नाही. साहित्य संमेलनापासून जागतिक मराठी साहित्य संमेलनापर्यंत त्याबद्दल चिंताही व्यक्त केली जाते. ही चिंता अधिक गडद होण्यसारख्या काही घटना आपल्या अवतीभवती घडत आहेत. मराठीची चिंता करणाऱ्यांनी या घटनांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. ज्यांची मातृभाषा मराठी आहे, अशी मुले दहावी आणि बारावीच्या परीक्षेत मराठी विषयातच अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण वाढते आहे. अकरावीतून बारावीत गेल्यानंतर मराठी भाषा सोडून देण्याचे प्रमाणही वाढते आहे.

भाषेचे प्रेम वाढण्याच्या वयातच मुले भाषेपासून तुटू लागली आणि मराठी हा विषय कमी गुण मिळवण्याचा आहे, जास्त गुण मिळवण्याचा नाही, अशी कुचेष्टा होऊ लागली, तर भाषेचे भवितव्य अधिकच धूसर व्हायला लागेल. हे धूसरपण संपवण्यासाठी केवळ शाळा-महाविद्यालयांनी नव्हे, तर सर्व मराठी माणसांनीच विचार केला पाहिजे.

दहावी आणि बारावी वर्गाच्या पातळीवर तिची अवस्था दयनीय होणे चिंताजनक आहे.

■

संदर्भ - मेहता मराठी ग्रंथजगत : एप्रिल २००४, पृ.१२

अभंग भंगावे । ओवी फुटावी । मुक्तछंदातून लय ओघळावी । चित्रातून कविता । कवितेतून चित्र बहरावे । एका ओळीची कविता अन् एका सरळरेषेचे चित्र व्हावे ॥

दिनकर मनवर, रेखाचित्रकार
(‘अनुष्टुभ’ मार्च-एप्रिल २००४ पृ. ५६)

अनुक्रमणिका

व्यंगचित्राकरवी विरेचन

शि. द. फडणीस
अनुवाद : वैशाली दाबके

व्यंगचित्रांबद्दलची आस्था केवळ सर्वसामान्यांमध्येच नव्हे तर संस्थात्मक पातळीवरही वाढत आहे, हे या चर्चासत्रामुळे निदर्शनाला येते. व्यंगचित्र आपल्या रेखा आणि रंगाच्या खास दृश्य भाषेतून आपल्याला काहीतरी सांगत असतं.

प्रत्येक भाषेबरोबर तिच्या व्याकरणाच्या नियमांनुसार व्यवहार करणारी अक्षरे, शब्द आणि वाक्ये असतात. असं म्हणतात, की जगात सुमारे पाच हजार भाषा आणि बोलीभाषा अस्तित्वात आहेत आणि त्यांतील शंभर भाषा महत्त्वाच्या असून वापरात आहेत.

आजच्या आक्रसत जाणाऱ्या जगाची गरज आहे जलद आणि सोपे संज्ञापन. दोन भाषांमध्ये दुवा जोडण्याचा एक मार्ग आहे अनुवाद; पण दृश्य भाषेचा उपयोग जास्त सोपा. आणि म्हणूनच आपण जास्तीत जास्त चिन्हांचा आणि प्रतीकांचा वापर संगणकासहित सगळ्याच क्षेत्रांत करत आहोत.

व्यंगचित्राकारिता ही कला 'ललित कला' आणि 'चित्रकला' मधील कलाकारांनी विकसित केली आहे. त्या कलाकारांना चित्रकलेच्या पायाभूत व्याकरणाची उत्तम जाण असते.

व्यंगचित्रांची भाषा ही जगन्मान्य होत चालली आहे आणि सर्व देशांमध्ये ह्या कलेच्या वाढीला / जोपासनेला उत्तेजन मिळतंय. "जगभरातून चित्रकलेविषयक परीक्षणांमध्ये व्यंगचित्रकारितेच्या वाढत्या महत्त्वाची दखल घेतली जात आहे. आपण आपल्या आजूबाजूला अनेक नवी प्रकाशने, संग्रहालये, चित्रसज्ञा, इतिहासकार, संग्राहक आणि हौशी मंडळी बघतो जी व्यंगचित्रांची भाषा आणि व्यंगचित्रांमधील व्यक्तिरेखांचे लोकप्रिय संस्कृतीतील आदिबंधात्मक घाट म्हणून उत्साहाने स्वागत करतात." (होगार्थ, १९७८)

व्यंगचित्रकार हा हेतुपूर्वक व्यंग निर्माण करतो. त्याच्याकडे चित्रे काढण्याची क्षमता आणि जीवनाकडे पाहण्याची विनोदी दृष्टी असण्याची नितांत आवश्यकता आहे.


अनुक्रमणिका

व्यंगचित्रकार प्रेक्षक वाचकांशी अनौपचारिकपणे बोलतो. तो एक संवाद असतो. व्याख्यान नव्हे!

पूर्वी म्हणजे साधारणतः १९ व्या शतकाच्या पूर्वी कलाकार ह्या कलेला caricature (अर्कचित्र) म्हणत असत. ह्या कलेचा जन्म इटलीमध्ये झाला आणि युरोपमध्ये तिचे संगोपन झाले. त्यानंतर 'Punch' नावाच्या एका नियतकालिकाने तिला उत्तेजन दिले. 'पंच'ने cartoon (व्यंगचित्र) हा शब्द प्रचलित केला. हा शब्द 'cartone' ह्या मूळ इटालियन शब्दापासून तयार झालेला आहे. Cartone ह्या शब्दाचा अर्थ आहे एक मोठा कागद जो साधारणतः म्यूरल्स किंवा टेपेस्ट्रीसाठी वापरला जातो. आता अर्कचित्र म्हणजे आवश्यक त्या व्यंगासह केलेले शैलीबद्ध रेखाटन होय. ह्या रेखाटनामधून त्या व्यक्तिमत्त्वाचा अर्क कमीतकमी रेषांमधून नजरेत भरेल ह्या दृष्टीने जाणवावा.

इंग्रजी भाषेमुळे Cartoon हा शब्द अमेरिका, कॅनडा आणि त्याकाळच्या ब्रिटिश वसाहतींमध्ये वापरला जाऊ लागला. अमेरिकेत तर व्यंगचित्रांचा जणू पूरच आला आहे.

नॉरमन् रॉकवेलची मुखपृष्ठावरची चित्रे, चार्ल्स शूल्झच्या "Peanuts" सारख्या मालिका जगभर बारा भाषांमध्ये प्रसारित झाल्या. वॉल्ट डिस्नेची प्राण्यांची व्यंगचित्रे आणि व्यंगचित्रमालिका अजूनही जगभरातील प्रेक्षकांमध्ये अतिशय लाडकी आहेत. भारतामध्ये मात्र व्यंगचित्रकलेची स्थिती वेगळी आहे. मुळातच क्रिकेटप्रमाणेच व्यंगचित्रकला भारतात आली ती ब्रिटिश पत्रकारितेमुळे. इंग्लंडचे ज्येष्ठ राजकीय व्यंगचित्रकार डेव्हिड लों मुळे अनेक भारतीय उदयोन्मुख



श्री. शि. द. फडणीस यांच्या या व्यंगचित्राचे प्रकाशन मॉंट्रिअलच्या आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र प्रदर्शनात झाले.

व्यंगचित्रकारांना प्रेरणा मिळाली. इंग्रजी वर्तमानपत्रात त्यांनी व्यंगचित्रे सुरू केली आणि नंतर ही कला इतर भाषांतील वर्तमानपत्रांमध्येसुद्धा आली. राजकीय व्यंगचित्रकारिता बऱ्याच प्रमाणात लोकप्रिय झाली आणि त्याबरोबर असा एक गैरसमजही झाला की व्यंगचित्रकारिता म्हणजे राजकीय व्यंगचित्रं. फक्त हाच नव्हे तर असाही एक गैरसमज झाला की राजकीय व्यंगचित्रकारितेसाठी चांगली चित्रकला येणे आवश्यक नाही. भारतातील अत्यंत आदरणीय अशा अबू एब्रहमने घेतलेल्या डेव्हिड लों च्या मुलाखतीत त्यांनी वरील समजाला पाठिंबा दिला नाही.

विनोदबुद्धी ही मानवजातीतील एक उपजत प्रवृत्ती आहे. प्राचीन संस्कृत नाटकांमध्ये विदूषकाच्या रूपात आपल्याला विनोद सापडतो. काही प्राचीन भारतीय भित्तिचित्रांमध्ये आणि शिल्पांमध्ये विनोदी कलाकृतीचं चित्रण आढळतं. हैद्राबादचे सुप्रसिद्ध कला संग्राहक श्री. जगदीश मित्तल ह्यांनी या विषयावर लिखाण केले आहे. (मित्तल, १९८६)

'हिंदू पंच' आणि 'किर्लोस्कर' सारख्या मराठी नियतकालिकांमधून आपल्याला व्यंगचित्रांचे अगदी सुरुवातीचे नमुने मिळतात. कलकत्त्याच्या श्री. गगनेंद्रनाथ टागोर यांची विनोदी चित्रे ह्याच काळातील आहेत.

विरेचनासाठी (catharsis) व्यंगचित्रे ही चित्रसमीक्षक आणि व्यंगचित्र समीक्षकांची नवीन जाणीव आहे. विरेचन हा शब्द साहित्य समीक्षेत शोकात्मिकेसाठी वापरला जातो. श्रेष्ठ तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल ह्याने कदाचित सुखात्मिकेतील विरेचनाबद्दल काही म्हटलेही असावे, पण हा विषय तसा फारसा माहीत झालेला नाही. (विमसॅट व वॉरन, १९५७)

विरेचन ही एक अमूर्त संज्ञा आहे. त्या क्रियेचा मानवी मनावर होणारा परिणाम हा बऱ्याच अंशी व्यंगचित्र बघणाऱ्याच्या संवेदनशीलतेवर अवलंबून असतो. त्यामुळे साहजिकच ह्या दृष्टिकोनातून व्यंगचित्रांचे कप्पेबंद वर्गीकरण शक्य नाही. विरेचन म्हणजेच कुठल्याही ताणतणावापासून मुक्तता. अशी मुक्तता सहसा चुटकेवजा व्यंगचित्रं किंवा व्यंगचित्र-मालिकांमधून मिळते. ह्या comic strips (व्यंगचित्रमालिका) आपल्याला कुठल्याही राजकीय, सामाजिक भाष्याव्यतिरिक्त निखळ विनोद देतात. हे असं व्यंगचित्र जीवनाचं सार असतं. हास्य हे मानवी वेदना आणि नैराश्यावरचा उतारा आहे. अजून एक प्रकारची मुक्तता म्हणजे उपरोध किंवा उपहास, म्हणजे दुसऱ्यावर केलेला विनोद आहे. उपरोधिक विनोद ही माणसाची नैसर्गिक गरज आहे, जी कुणालाही निरोगी पद्धतीने बारीक चिमटे

काढायला किंवा एखाद्या गोष्टीबद्दल नापसंती दर्शवायला उपयोगी पडते.

काही वेळेला राजकीय, सामाजिक किंवा वैयक्तिक प्रसंग असे असतात, की माणूस स्वतः त्याबद्दलची वेदना वा दुःख थेटपणे नोंदवू शकत नाही. अशावेळी एक उपहासगर्भ व्यंगचित्र ही वेदना वा दुःख धीटपणे नोंदवू शकते, आणि मग व्यंगचित्र बघणाऱ्या सर्वसामान्य व्यक्तीला आपल्या भावना व्यक्त झाल्याचं समाधान मिळतं. मग स्वतःशीच तो म्हणू शकतो. “अरे हेच तर मलाही म्हणायचं होतं. पण माझ्यात ते बोलून दाखवण्याचं धैर्य नव्हतं.” ज्यावेळेला एखादं व्यंगचित्र सामाजिक किंवा राजकीय घटनेवर प्रकाश टाकतं, त्यावेळेला असं सामुदायिक विरेचन अनुभवायला मिळतं.

व्यंगचित्राच्या मुळाशी आहे एक वस्तुस्थिती. ती म्हणजे कोणीही कितीही हुशार, बुद्धिमान किंवा प्रतिष्ठित असला तरी तो परिपूर्ण नसतो. प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वात काहीतरी विसंगती किंवा विक्षिप्तपणा दडलेला असतो. व्यंगचित्र नेमकं तीच विसंगती किंवा विक्षिप्तपणा शोधून काढून त्या छटा पुढे आणतं, अर्थातच कुठलाही आकस न ठेवता!

व्यंगचित्राचे नाते शहाणपणा आणि तारतम्यबुद्धीशी आहे.

मला स्वतःला नेहमीच माझ्या प्रदर्शनांमधून व्यंगचित्रांच्या भाषेबाबत प्रेक्षकांच्या बोलक्या प्रतिक्रिया मिळाल्या आहेत. माझी सर्वाधिक व्यंगचित्रे ही कोणत्याही शब्दांच्या मदतीशिवाय आहेत. ती अगदी सहजतेने भाषेच्या मर्यादा ओलांडून जातात. माझं व्यंगचित्राचं प्रदर्शन ‘हसरी गॅलरी’ भारतात आणि अमेरिका, इंग्लंडसारख्या देशांमध्ये भरवलं गेलं. येणारे प्रेक्षक बहुभाषिक होते आणि तेही वेगवेगळ्या वयोगटांतले आणि विशेष म्हणजे सर्वांना ते प्रदर्शन मनापासून आवडलं. माझी प्रेक्षकांकडून अगदी माफक अपेक्षा होती. ती म्हणजे त्यांना प्रदर्शन आवडावं आणि त्यांनी हसत घरी जावं. काही वेळेला अगदी वेगळ्या प्रेक्षकांकडूनही मला प्रतिक्रिया मिळाल्या. त्यांतील काही जण मुके-बहिरे होते तर काही जण शारीरिकदृष्ट्या अपंग आणि काही मानसिक रुग्ण होते. (त्यांच्या डॉक्टर्सच्या सांगण्यावरून ते आले असावेत.) त्या लोकांना व्यंगचित्रांकडून मिळालेला आनंद त्यांच्या आयुष्यात वेगळ्या प्रकारचा होता.

मी अगदी थोडक्यात माझ्या व्यंगचित्रांची माहिती इथे देतो. एक काम करणारी बाई तिच्या दारुड्या नवऱ्याबद्दलचा निषेध प्रतीकात्मक पद्धतीने दणादणा धुणं बडवून नोंदवतेय. हे व्यंगचित्र मुखपृष्ठरूपाने प्रसिद्ध झालं होतं. त्याचप्रमाणे

एका जर्मन मासिकामध्येही ते प्रसिद्ध झालं होतं. ह्या उदाहरणात विरेचनाचे तत्त्व हे हेतुपुरस्सर त्यात घातलेले नाही. भोवतालच्या सामाजिक वातावरणाचा आणि वैयक्तिक अनुभवांचा परिणाम हा व्यंगचित्रांत अगदी सहजपणे प्रतिबिंबित होतो. ज्यावेळेला आपण एखाद्या विशेष विषयासाठी किंवा वस्तूंच्या जाहिरातींसाठी व्यंगचित्र काढतो त्यावेळेला त्याची हाताळणी वेगळी असते. मला वेगवेगळ्या विषयांवर काम करण्याची संधी मिळाली. ह्या विषयांमध्ये गणित, वैद्यकशास्त्र, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, शिक्षण, कायदा किंवा अगदी तत्त्वज्ञानासारखे विविध विषय होते. इथे व्यंगचित्रांचं काम आहे, ते त्या विषयांची क्लिष्टता सोपी करणे आणि आशयाचा कस अजिबात कमी न करता तो विषय हलक्या फुलक्या हाताळणीने सादर करणे.

रेखाचित्रं आणि रंगचित्रं अनेक चळवळींमधून, वादांमधून, स्थित्यंतरांमधून जात आली आहेत. अगदी अमूर्त कला, घनवाद, पॉपकला यापासून अजिबात कला नसण्यापर्यंत ही स्थित्यंतरे दिसतात. ह्या सर्व स्थित्यंतरांमध्ये व्यंगचित्रकलेने रेखाटन-कलेला जिवंत ठेवलं.

काही व्यंगचित्रकारांनी नव चित्रकलेचे काही चांगले आणि उपयुक्त विशेष व्यंगचित्रांसाठी आत्मसात केले आहेत.

व्यंगचित्र हे काही फक्त दांभिक नेत्यांवर टीका करण्यासाठी किंवा त्यांचा निषेध करण्यापुरतेच वापरलं जाऊ नये.

व्यंगचित्र बऱ्याच प्रकारच्या भूमिका निभावते. शैक्षणिक उद्देशाने तयार केलेल्या पुस्तकांमध्ये किंवा भित्तिपत्रकांमध्ये व्यंगचित्र वेगवेगळ्या प्रकारची कामगिरी बजावते. इथे व्यंगचित्र साध्या ठळक आणि आकर्षक पद्धतीने पुढे येते. आटोपशीरपणा आणि सुस्पष्टपणा ह्या गोष्टी व्यंगचित्रांमध्ये खूप महत्त्वाच्या ठरतात. काही व्यंगचित्रांमध्ये आपल्याला अगदी सौम्य विनोद काव्यात्मदृष्ट्या झालेला दिसतो. कवी जॉन कीटस् म्हणतो, “कवितेने वाचकांना अगदी सहजपणे आश्चर्यचकित करायला हवं.” हीच गोष्ट व्यंगचित्रांबाबतही म्हणता येईल. व्यंगचित्रांना विविध प्रकारच्या भावस्थिती आणि विविध चेहरे असतात. आनंद आणि दु:ख ह्या व्यंगचित्रांच्या सुद्धा दोन बाजू आहेत. १८ व्या शतकातील विख्यात ब्रिटिश चित्रकार विल्यम होगार्थने मनुष्यातली प्राण्यांची मानसिकता आपल्या चित्रांत प्रकट करून सामाजिक उपहास दर्शवला.

अमेरिकेच्या नॉर्मन रॉकवेलने अमेरिकन लोकांच्या आयुष्यातले सरळ, साधे

पण रोचक क्षण आपल्या चित्रांमधून दाखवले. ही चित्रे अमेरिकन Saturaly Evening Post च्या मुखपृष्ठांवर झळकली. वरील दोन्ही चित्रकार आपापल्या देशांमध्ये अतिशय लोकप्रिय होते. समाजातील दुःख, आनंद, प्रश्न हे सारं त्यांच्या चित्रांमधून प्रतीत झालं. ही चित्र निव्वळ विनोदी चित्रं आहेत.

व्यंगचित्रांचं बायबल 'पंच'ने दीशडेहून अधिक वर्षं ह्या व्यंगचित्रांच्या जगावर अधिराज्य गाजवलं. जगभरातील अनेक व्यंगचित्रकारांनी ह्या नियतकालिकापासून प्रेरणा घेतली.

अमेरिकेमध्ये व्यंगचित्रमालिकांमधून (comic strips) विनोद प्रचंड प्रमाणात



चित्र : बँकेच्या माहितीपुस्तकासाठी

वाढीला लागला. ह्या मालिकांच्या निर्मात्यांनी त्यांचे कलाकार / चित्रकार जगभर पोचवले. भारतीय इंग्रजी वृत्तपत्रांनी ह्या व्यंगचित्र मालिका त्यांच्या वर्तमानपत्रांतून प्रकाशित करायला सुरुवात केली. ह्या व्यंगचित्रमालिका स्वस्त आणि वापरायला सोप्या होत्या. पण ह्या व्यंगचित्रांचे विषय आणि त्यांतील घटना भारतीय वाचकाला अपरिचित होत्या. त्यावेळेला पहिल्यांदा ह्या मातीत जन्माला येणाऱ्या व्यंगचित्र-मालिकांची गरज जाणवली. काही दिवसांपूर्वी इंडियन एक्सप्रेसने ह्या विषयावरील मुलाखती प्रसिद्ध केल्या होत्या.

सर्व प्रसिद्ध राजकीय व्यंगचित्रकारांच्या मुलाखती घेतल्या गेल्या. त्यांपैकी कोणीही समाधानकारक वा सकारात्मक उत्तरे दिली नाहीत. भारतामध्ये व्यंगचित्रपटांची सुद्धा हीच गत आहे. आपण ह्या क्षेत्रात प्रगती करू शकलेलो नाही. आपल्या 'रामायण' आणि 'हनुमान' ह्या दोन विषयांवर संगणकाच्या मदतीने व्यंगचित्रपट बनवण्यात आले. हे व्यंगचित्रपट अमेरिका आणि कोरियामधील कलाकारांनी बनविले.

भारतीय राजकीय व्यंगचित्रकारांचे अध्वर्यू शंकर ह्यांचं पंडित नेहरूंनी कौतुक केलं होतं. ह्या कौतुकामुळेच भारतात व्यंगचित्रांबाबत एक सकारात्मक निरोगी दृष्टिकोन तयार व्हायला मदत झाली. आपल्याला इथे अबू एब्रहम, लक्ष्मण, राममूर्ती, उन्नी, मंगुळा पद्मनाभन आणि इतर अशा अनेक सुप्रसिद्ध व्यंगचित्रकारांची नावे सांगता येतील, जे नवीन व्यंगचित्रकारांचे स्फूर्तिस्थान आहेत. वर्तमानपत्रांमुळे व्यंगचित्रं घराघरांत पोहोचली आहेत.

सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार अबू एब्रहम म्हणतात, " भारतातील खरा विनोद हा वेगवेगळ्या भाषांमध्ये आहे. आणि एका विशिष्ट प्रदेशातल्या, विशिष्ट भाषा जाणणाऱ्या भारतीयाला दुसऱ्या राज्यातील, दुसऱ्या भाषेतील विनोद समजणे अवघड आहे. नेमकं हेच आपण इंग्रजीबद्दल म्हणू शकतो. इंग्रजी शिकलेल्या भारतीयाला इंग्रजांच्या विनोदाचा खऱ्या अर्थानं रसास्वाद घेणं अवघड आहे."

पत्रकार आणि व्यंगचित्रकारांसाठी खरा अवघड काळ होता तो आणीबाणीचा (१९७५-७७). भाषण-स्वातंत्र्य, लेखन-स्वातंत्र्य किंवा कुठलाही विचार प्रकट करण्याचं स्वातंत्र्य त्या काळात नव्हतं. फक्त सेन्सॉरच्या चाळणीतून गेलेले साहित्य प्रसिद्ध करायला परवानगी होती. व्यंगचित्रांबाबत काहीही ठरवणं सेन्सॉर बोर्डाला अवघड झालं होतं. त्यामुळे तीन महिन्यांनंतर व्यंगचित्रांवरील निर्बंध उठविण्यात आले. व्यंगचित्र हे एक दृश्य विधान आहे. व्यंगचित्रांची उपहासगर्भ भाषा ही अशा

काळामध्ये फार प्रभावशाली ठरते.

अलीकडच्या काळात हास्य क्लब्स (laughter clubs) बद्दल ऐकतो. काही लोक फक्त हसण्यासाठी एकत्र येतात. ठणठणीत तब्बेत राखण्याकरिता हास्य हे कुठलाही अपाय न करणारं औषध आहे, हे यामुळे स्पष्ट होते.

असं आढळलं आहे, की हसताना आपला मेंदू असे काही रासायनिक रेणू तयार करतो ज्यामध्ये कोणताही ताण कमी करण्याची शक्ती असते. वरील विधानाला नॉर्मल कझिन्सच्या सुप्रसिद्ध पुस्तकामध्येही (Anatomy of Illness) पुष्टी देण्यात आली आहे. व्यंगचित्र पाहणे हे एक संज्ञापनाचे माध्यम आहे. तुम्ही हसा आणि तुम्हांला जाणवेल की तुम्ही एकटे नाही आहात. कुठल्याही प्रकारचे



HER 'ACT' OF PROHIBITION

चित्र : 'इ.पी.डी.' या जर्मन मासिकात प्रकाशित - फेब्रु. १९९८

संज्ञापन हीच मानवी जीवनाची खरी अस्तित्वखूण आहे.

सामाजिक व्यंगचित्रांमध्ये आणि निखळ विनोदामध्ये आपल्या डोळ्यांसमोर अशी अनेक नावे येतात जी या व्यंगचित्रांच्या जगात लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत. इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये मारिओ मिरिंडा, सुधीर दर, अजित निनाव, विन्स् मोरपरिया यांसारखे लोक त्यांच्या बुद्धिचातुर्य आणि शैलीबाबत प्रसिद्ध आहेत. आपल्याला प्रादेशिक भाषांच्या वृत्तपत्रांमधूनही विविध चांगली व्यंगचित्रे पाहायला मिळतात.

श्री. गोपुलु (आनंद-विकटन-तमिळ), बापू (आंध्र प्रदेश), श्री. नाडिग (कर्नाटक), प्राण (नवी दिल्ली - चाचा चौधरी) ही काही प्रादेशिक भाषांच्या वृत्तपत्रांमधील नावे वानगीदाखल देता येतील.

महाराष्ट्रामध्ये एक संपादक आणि व्यंगचित्रकार चिरस्मृत शं. वा. किर्लोस्कर ह्यांनी ही कला रुजवण्यात पुढाकार घेतला. त्यानंतर श्री. लचके, चिरस्मृत दीनानाथ दलाल ह्यांचंही व्यंगचित्रांमध्ये खूप मोठं योगदान आहे. अतिशय आशयगर्भ आणि बुद्धिनिष्ठ व्यंगचित्र काढणारे वसंत सरवटे, लोकप्रिय व्यंगचित्र मालिका ‘चिंटू’ सादर करणारे चारुहास पंडित आहेत. तसेच राजकीय व्यंगचित्रकारांमध्ये विकास सबनीस आणि काही इतर हे मराठी वाचकांमध्ये परिचित आहेत. श्री. बाळ ठाकरे हे भारतभर राजकीय नेता म्हणून सुप्रसिद्ध आहेत. पण त्यांनी एक व्यंगचित्रकार म्हणून केलेली या क्षेत्रातली कामगिरी सुपरिचित आणि महत्त्वपूर्ण आहे.

भारतामध्ये व्यंगचित्र प्रसारित करणाऱ्या अशा सिंडिकेट्स नाहीत की ज्यांच्यामार्फत व्यंगचित्रे विविध भारतीय भाषांमध्ये अनुवादित करून प्रसिद्ध केली जातील.

व्यंगचित्रांना मिळणाऱ्या वाढत्या लोकप्रियतेमुळे बरेच नवे कलाकार ह्या क्षेत्राकडे वळत आहेत. अर्थातच चांगलं आणि साधारण दोन्ही स्वरूपाचं काम आपल्याला पाहायला मिळेल. पण काळजी करण्याचं कारण नाही. फक्त चांगलं व्यंगचित्रच तरून जाईल. बाकीचं अर्थातच विसरलं जाईल.

ह्या चर्चासत्राच्या निमित्ताने मला असं सुचवावसं वाटतं, की ज्या संस्थांना ह्या कलेमध्ये रुची आहे त्यांनी ही कला वाढवायला, जोपासायला, सर्व अंगांनी तिला पारखून पाहायला तसंच तिच्या विकासासाठी सकारात्मक दृष्टिकोन तयार करायला मदत करायला हवी.

संगणकाचा जादुई कुंचला आणि इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमे ह्या क्षेत्रात प्रवेश

करीत आहेत. हा प्रवेश आपण स्वागतार्ह मानला पाहिजे. आणि कलाकारांसाठी ही उपकरणं महत्त्वाची आणि मोलाची मदत करतील, ह्या दृष्टीने आपण त्याकडे पाहायला हवं. ह्या माध्यमातील चांगल्या गोष्टी निर्माण करण्याची शक्ती असलेला मानवी मेंदू हा कधीही सर्वांत वरच्या स्थानावर असणार आहे. त्यामुळेच आपण ह्या नवीन गोष्टींचं स्वागत करायला हवं. आपल्याला परिचित किंवा अपरिचित अशा नव्या दृष्टिकोनांचं या एकमेवाद्वितीय अशा व्यंगचित्रकलेचा निरोगी विकास होण्यासाठी स्वागतच करायला हवं.

संदर्भ

- अबू एब्रहम Introduction समावेश : Indian Cartoons पेंग्विन बुक्स, १९८८
- अबू एब्रहम Foreword समावेश : Indian Caricatures हिंदुस्थान टाईम्स, १९९२.
- मित्तल, जगदीश, लेख पंचधारा (हैद्राबाद) एप्रिल १९८६.
- Wimsatt, William K. Junior; Brooks, Cleanth Literary criticism : A short history. New York Knopf, 1957. Chapter 4. Section V.
- सरदेसाई, ह. वि. हास्य. सकाळ (पुणे) २०:५:२००२
- Hogarth, Burne, भाषण International Salon of cartoons, Montreal. Canada, 1978

इतिकथन

भारतीय भाषा, संस्थान, मैसूर येथे "कॉलोक्वियम ऑन द लँग्वेज ऑव्ह कार्टून अँड कॉमिक आर्ट" नावाचे चर्चासत्र झाले (चर्चासत्र व प्रदर्शन ३०-३१ ऑक्टोबर २००२). तेथे लेखकाने 'कार्टून्ज फॉर कॅथार्सिस' हा इंग्रजी निबंध ३०:१०:२००३ रोजी वाचला. त्याचा हा अनुमतिपूर्वक केलेला अनुवाद.

■

लेखकाचा पत्ता : शि. द. फडणीस,
सुभाषनगर, गल्ली ४, १२३३ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.
अनुवादकाचा पत्ता : वैशाली दाबके,
१५, सहदेव हाईटस्, बाणेर रस्ता, पुणे ४११००८.

गमती भाषेच्या

वृषाली देहाडराय

एखाद्या समाजाची संस्कृती व परंपरा यांचे महत्त्वाचे अंग म्हणजे त्या समाजाची मौखिक भाषा व लिखित स्वरूपातील प्रमाण भाषा. भाषा व त्यातले साहित्य समाजमन प्रतिबिंबित करते. समाजातील चालीरीती, रूढी यांचे आदानप्रदान करण्याचे भाषा हे एक महत्त्वाचे साधन आहे. समाजाची अभिरुची, क्षमता, दृष्टिकोन प्रचलित भाषेमध्ये प्रतीत होतो.

संस्कृतोद्‌भव अनेक भाषांचे एक महत्त्वाचे वैशिष्ठ्य म्हणजे मानव व प्राण्यांप्रमाणेच इतर अचल व निर्जीव पदार्थांना लिंग बहाल करणे. द्राविडी भाषा गटातील तामीळ, तुळू, कानडी या भाषांमध्ये निर्जीव वस्तू तसेच सजीव पण अचल पदार्थ (झाड, फुले इ.) यांचे लिंग नेहमी नपुंसकलिंगच असते. कोणत्या घटकाकरता कोणते लिंग वापरले जाते याचा अभ्यास केल्यावर अनेक बाबी दिसून आल्या. समाजाचा दृष्टिकोन भाषेतही प्रतिबिंबित होतो, या सिद्धांताला पुष्टी देणारा आणखी एक पुरावा या निरीक्षणांद्वारे मिळाला.

'समाजात स्त्रीचे स्थान नेहमी दुय्यमच असते किंवा असायलाच हवे' या समजुतीबाबत अपवादानेच दुमत आढळते. स्त्री ही सर्वसाधारणपणे नाजूक, कोमल, दुर्बल, परावलंबी असून तिची सामाजिक प्रतिष्ठा, दर्जा व मूल्य हे पुरुषापेक्षा निश्चितच कमी आहे, अशी समजूत प्रचलित असल्याचे दिसून येते.

मराठी प्रमाणभाषेचे निरीक्षण केले असता असे दिसते, की ज्या वस्तूंचे सामाजिक व आर्थिक मूल्य कमी आहे आणि आकार लहान आहे अशा वस्तूंकरता पुल्लिंग व क्वचितप्रसंगी नपुंसकलिंग वापरले जाते. रोजच्या वापरातील साध्यासाध्या शब्दांवरून याची प्रचीती येते. जाडजूड मोठा असणारा "तो ग्रंथ" मात्र छोटीशी आणि बहुदा विनामूल्य किंवा नाममात्र मूल्य असणारी "ती पुस्तिका". आकाराने मोठा असणारा "तो डबा" व लहान "ती डबी". लग्नासारख्या महत्त्वपूर्ण प्रसंगात नेसण्याचा "तो शालू" व रोजच्या वापराची "ती साडी", श्रीमंताचा "तो बंगला" व गरिबाची "ती झोपडी". दिवाणखान्यात मानाने विराजमान होणारा "तो सोफा" आणि कोणत्याही कोपऱ्यात मावणारी

"ती खुर्ची". राजाचा "तो मुकुट" आणि गरिबाची मात्र "टोपी". अवजड वाहनांमधील ट्रक, ट्रॅक्टर ही सगळी वाहने पुरुषीपणा मिरवणारी, बाकी सर्व लहान वाहने स्त्रीलिंगी म्हणून ओळखली जातात. यांतील आणखी एक विरोधाभास म्हणजे या सर्व प्रकारच्या वाहनांना इंग्रजीमध्ये 'it' म्हणून संबोधले जाते. मात्र मराठीत ही मंडळी पुरुषत्व किंवा स्त्रीत्व धारण करतात. हे पुरुषत्व किंवा स्त्रीत्व यांचा संबंध आकार व ताकद या दोन बाबींशी जोडला जातो.

काही शब्दांचे लिंग हे केवळ आकारावरून किंवा आकार व आर्थिक मूल्य अशा दुहेरी निकषांवरून ठरते. जसे खडू - पेन्सील, पेन - पेन्सील, तांब्या - लोटी, दार- खिडकी, जहाज-होडी, हंडा -कळशी, बिगुल - शिट्टी, मजकूर - तळटीप, नाटक - नाटिका, वाडगा - वाटी, पिआनो - पेटी, आकडा - पीन, समुद्र - नदी, खिळा - चूक, डोंगर - टेकडी, कंगवा - फणी, थाळा - ताटली, रस्ता - पायवाट, तक्क्या - उशी. अशी कितीतरी आणखी उदाहरणे देता येतील.

हे लिंगारोपण केवळ आकाराशी निगडित आहे, का स्त्रीचा दर्जा कमी लेखला जातो म्हणून असे केले जाते, ही बाब विचार करण्याजोगी आहे. एखाद्या वस्तूच्या सामाजिक दर्जावरूनही लिंगारोपण केले जाते. शालू- साडी, बंगला - झोपडी ही उदाहरणे सुरुवातीलाच दिली आहेत. या शिवाय शाळा - महाविद्यालय, सोने - चांदी, कुंकू - हळद, बूट - चप्पल अशी अनेक उदाहरणे देता येतील. दागिन्यांच्या बाबतीत तर वजनानुसार तसेच भारदस्त दिसणाऱ्या मंडळींना पुल्लिंगी ठरवले गेले आहे. कमी वजनाची बांगडी आणि पाटली स्त्रीलिंगी तर तोडा व गोठ मात्र पुल्लिंगी. बोरमाळ, जोंधळेपोत स्त्रीलिंगी मात्र तन्मणी, चपलाहार पुल्लिंगी. यात मोठ्या वस्तूंचे कधी पुल्लिंग किंवा नपुंसकलिंग असते. मात्र छोटी वस्तु ही नेहमी स्त्रीलिंगीच असते.

निसर्गाने (?) स्त्रियांना नाजूक कोमल बनवले आहे. या समजुतीप्रमाणेच फुलांमध्ये जास्त टिकणाऱ्या व आकाराने मोठ्या फुलांकरता पुल्लिंग किंवा नपुंसकलिंग वापरले जाते. उदा. गुलाब, झेंडू, कमळ, मात्र नाजूक फुले ही स्त्रीलिंगीच असतात जसे जाई, जुई, अबोली, सायली. जीवनाच्या प्रत्येक अवस्थेत स्त्री कोणत्या ना कोणत्या पुरुषाच्या आधाराने जगत असते. त्याचप्रकारे दुसऱ्याच्या आधारावर वाढणाऱ्या वेलीला स्त्रीलिंगी मानले जाते. याउलट कुटुंबातल्या कर्त्या पुरुषाला वटवृक्षाची किंवा आधारवडाची उपमा दिली जाते. व्याकरणानुसार देखील वृक्ष हे पुल्लिंगी नाम आहे.

या लिंगयोजनेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे काही शब्द असेही आहेत, की ज्यांचे पुल्लिंगी रूप प्रचलित नाही. जेव्हा या वस्तूंचे आकार त्यांच्या सर्वसामान्य आकारांपेक्षा मोठे असतात त्यावेळी त्या शब्दांचे पुल्लिंगी रूप करून वापरले जाते. मात्र हे पुल्लिंगी रूप फारसे प्रचलित नसते. एखादीने खूप मोठ्या आकाराची टिकली लावल्यास "एवढा मोठा टिकला का लावला आहेस?" असे विचारले जाते किंवा खूप मोठ्या आकाराची पिशवी असल्यास "हा मोठा पिसवा घेऊन कुठे चाललीस?" या सारखे प्रश्न सहजगत्या विचारले जातात.

या सर्व उदाहरणांवरून असे दिसून येते, की पुरुषी वर्चस्वाचा पगडा भाषेवरही मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. स्त्री - पुरुष समानता आणण्यासाठी सगळ्यांनी जरी मनापासून प्रयत्न केले तरी भाषेमध्ये ही समानता आणणे शक्य होईल का? भाषेची व्याकरणासकट मूलभूत स्थित्यंतरे घडून येतील का? ही स्थित्यंतरे मराठी भाषेला पेलवतील का? कदाचित काळच या प्रश्नांची उत्तरे आपल्याला देईल.

■

भारतीय शिक्षण संस्था,
जे. पी. नाईक पथ, कोथरूड, पुणे - २९

भाषा हेच जीवन

भोपाळहून प्रकाशित होणाऱ्या 'साक्षात्कार' या हिंदी मासिकाच्या डिसेंबर २००३च्या अंकात साहित्यिक नरेंद्र जैन यांच्या रोजनिशीचा काही भाग छापून आला आहे. त्यातल्या एका नोंदीत त्यांनी 'धर्मनिरपेक्षता आणि साहित्य' या विषयावरच्या एका परिसंवादात असगर अलि इंजिनिअर यांनी सांगितलेली एक आठवण दिली आहे. असगर अली इंजिनिअर हे काही कामानिमित्त केरळमध्ये प्रवास करत होते. सोबत दुभाषा होता. एका गावात एका मुस्लिम स्त्रीबरोबर संभाषण चालू असताना दुभाषा म्हणाला, "हेसुद्धा मुसलमानआहेत." तेव्हा ती महिला म्हणाली, "अरे, ज्याला मल्याळी भाषा येत नाही, तो मुसलमान कसा काय असू शकेल?"

■

जयप्रकाश सावंत
ईश्वर, मोहन नगर, डहाणूकर वाडी, कांदिवली (प.) मुंबई ४०००६७

मराठीपुढील आजची आव्हाने : कार्यक्रमवृत्तांत

राजशेखर शिंदे

महाराष्ट्रदिनाचे औचित्य साधून मराठी अभ्यास परिषद व महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने "मराठीपुढील आजची आव्हाने" या विषयावर १ मे रोजी चर्चा आयोजित करण्यात आली होती.

हा कार्यक्रम दोन भागांत विभागला होता. दुपारी दोन ते चार या पहिल्या सत्राचा विषय होता, "विविध संस्थांना अभिप्रेत असलेला मराठी विकासाचा कार्यक्रम". अध्यक्षस्थानी डॉ. गं.ना. जोगळेकर होते. तर दुसऱ्या सत्रामध्ये (दु. ४.३० ते ६.३०) खुली चर्चा होती. विषय होता "आजच्या मराठीविषयीची माझी प्रतिक्रिया". सुरुवातीला निमंत्रितांनी आणि श्रोत्यांनी आपापला परिचय करून दिला आणि त्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली.

प्रारंभी प्रा. प्र.ना. परांजपे यांनी प्रास्ताविक केले. प्रस्तुत कार्यक्रमामागील उद्देश त्यांनी स्पष्ट केला. मराठीच्या अभिवृद्धीसाठी ज्या संस्था कार्यरत आहेत, त्या सर्व संस्थांना एकत्रित आणून त्यांच्या कार्याची इतरांना व एकूण समाजाला ओळख व्हावी, मराठी भाषेच्या विकासाचा कृतिआराखडा तयार व्हावा, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला असल्याचे प्र. ना. परांजपे यांनी सांगितले. ते म्हणाले की, मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी मराठी वृत्तसंस्था निर्माण व्हावी. वृत्तपत्रांतील भाषेचा जनमनावर मोठा परिणाम होतो. अशी एकछत्री संस्था झाल्यास तीच सर्वांना तयार वृत्त पुरवेल. त्यामुळे भाषा सुधारेल, भाषांतर करणे सोपे होईल. प्रास्ताविकानंतर पुढील संस्थांच्या प्रतिनिधींनी आपल्या संस्था कोणते काम करीत आहेत, हे स्पष्ट केले.

'मराठी अर्थशास्त्र परिषदे'चे प्रतिनिधी डॉ. व्यं. सु. पाटणकर यांनी १९७७ मध्ये मराठी अर्थशास्त्र परिषदेची स्थापना झाल्याचे सांगितले. अर्थशास्त्राचे मराठी भाषेतून अध्ययन, अध्यापन व संशोधन आणि प्रबोधन तसेच अर्थशास्त्रीय विचार व अर्थशास्त्रीय दृष्टिकोन प्रसृत करणे, म्हणजे मराठी भाषेचे संवर्धन

करणे, ह्या उद्दिष्टांनिशी गेली २८ वर्षे मराठी अर्थशास्त्र परिषद कार्यरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. परिषदेने १९८७ मध्ये मराठीतला पहिला 'अर्थशास्त्र परिभाषा कोश' प्रकाशित केला. मराठीतूनच 'अर्थसंवाद' हे नियतकालिकही परिषद चालवीत आहे. "अर्थ शब्दांची वाट पाहे" हे सदर अव्याहतपणे या नियतकालिकातून चालविले जाते. अर्थशास्त्राविषयी मराठी भाषेतून 'संकल्पना कोश' तयार करण्याचा विचार चालू असल्याचे त्यांनी सांगितले.

'महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदे'च्या प्रतिनिधी म्हणून प्रा. गौरी भागवत उपस्थित होत्या. तत्त्वज्ञान परिषदेची स्थापना १९८१ साली वैचारिक साक्षरता वाढविण्यासाठी मातृभाषेतून शिक्षण, पाश्चिमात्य आणि पौर्वात्य दार्शनिकांचा मराठी भाषेतून पाठपुरावा इत्यादी उद्देश आहेत, असे त्यांनी सांगितले. अमराठी मंडळींनी तत्त्वज्ञान-परिषदेमध्ये सहभागी होण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. त्यासाठी मराठीतून निबंध सादरीकरणासारखे उपक्रम घेतले जातात. मराठी भाषेच्या दृष्टीने शालेय पातळीवरील मूल्यशिक्षणाचा उपक्रम हाती घेण्याचा परिषद विचार करीत आहे. मनुष्य, निसर्ग आणि मूल्यशिक्षण यांची जीवनासाठी सांगड असा त्याचा विचारगाभा राहील, असे प्रा. भागवत म्हणाल्या. परिषद दरवर्षी अधिवेशन घेते. या वर्षी शिवणे इथे अधिवेशन होणार असून "आदिवासी संस्कृतीची नैतिक आणि सौंदर्यशास्त्रीय जाणीव" या विषयावर विचार मंथन होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक परिषदेच्या प्रतिनिधी म्हणून डॉ.पुष्पा लिमये उपस्थित होत्या. १०८ वर्षांची प्रदीर्घ परंपरा असलेली ही संस्था मराठी ग्रंथांना पारितोषिके देते. संस्कृत, जर्मन, मराठी, इंग्लिश या भाषांचे पर्यायी शब्दकोश तयार करण्याचा संस्थेचा संकल्प आहे. तसेच उपलब्ध ग्रंथ मायक्रोफिल्मींग करून जतन करण्यासाठी केंद्र सरकाकडून अर्थसाहाय्य मिळते, असे त्यांनी सांगितले. प्राथमिक शाळेतील शिक्षकांसाठी मराठी भाषेचे वर्ग घेण्याचा विचार संस्था करत असल्याचे त्यांनी सांगितले. पुण्यात औंधमध्ये नव्यानेच स्थापन झालेल्या 'अक्षरधारा' संस्थेच्या उपक्रमांची माहिती प्रा. आशा मुंडले यांनी दिली.

'पश्चिम विभागीय भाषा केंद्र' या संस्थेत काही काळ काम केलेले प्राध्यापक डॉ. कल्याण काळे यांनी या संस्थेची माहिती दिली. ही संस्था म्हैसूरच्या 'भारतीय भाषासंस्थान'ची शाखा आहे. आंतरभारतीच्या तत्त्वावर हिचे कार्य चालते. मराठी, सिंधी, गुजराती या भाषा शिक्षकांना येथे द्वितीय भाषेच्या पातळीवर शिकविल्या

जातात. अमराठी भाषक शिक्षकही मराठी शिकण्यासाठी येतात. त्यांनी त्यांच्या राज्यात मराठी भाषा शिकवावी अशी अपेक्षा असते. भाषाभ्यासासोबत मराठी साहित्याची त्यांच्यात आवड निर्माण केली जाते. मराठीच्या अध्यापनासाठी शिबिरे घेतली जातात. दर तीन-तीन वर्षांनी उद्‌बोधन वर्गही घेतले जातात. अध्यापनासाठी लागणारी शैक्षणिक सामग्री संस्था स्वतः निर्माण करते. अमराठी शिक्षकांना मराठी भाषेचे अध्यापन करणारी ही एकमेव संस्था असल्याचे त्यांनी सांगितले.

रवींद्र सुर्वे यांनी 'आपणच' या संस्थेची सविस्तर माहिती दिली. शैक्षणिक क्षेत्रातल्या समस्येच्या निराकरणासाठी या संस्थेची स्थापना झाली आहे. मराठी भाषेचे अध्ययन, अध्यापन हे संस्थेचे उद्देश आहेत. सामाजिक दडपणामुळे मराठीच्या निवड स्वातंत्र्याला पालकवर्ग मुकत आहे. वस्तुनिष्ठ परीक्षा-पद्धतीमुळे अध्यापकांवर अनेक अनिष्ट परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले. भाषा प्रबोधन घडवून आणणे, श्रवणसंस्कृती विकसित करणे, अभिजात मराठीचे श्रवण विद्यार्थी कसे करतील याकडे लक्ष देणे, ग्रार्मीण शिक्षकांच्या अध्यापनातील अडचणींवर मात करण्यासाठी साधन केंद्र उभे करणे इत्यादी संकल्प असल्याचे सुर्वे यांनी सांगितले.

'समर्थ मराठी संस्था' या संस्थेचे अनिल गोरे यांनी सध्याच्या बिनभाषिक बनलेल्या महाराष्ट्राला मराठी भाषिक बनविण्याचा संस्थेचा उद्देश असल्याचे सांगितले. मराठीमध्ये इंग्रजीची भेसळ थांबविण्याचे काम संस्थेचे सदस्य करीत असतात. अशा भेसळ पद्धतींनी लिहिणाऱ्या लेखकांना उपहासात्मक पत्रे पाठविली जातात. संस्थेने आतापर्यंत ५७००० पत्रे पाठविलेली आहेत! मराठीचा वापर व्यापार क्षेत्रात वाढण्यासाठी संस्थेची धडपड आहे. त्यासाठी 'आर्थिक शुभेच्छा' हा कार्यक्रम ही संस्था राबविते.

'मराठी भाषा अभियान' तर्फे श्री. सु. वि. जोशी या कार्यक्रमासाठी आले होते. त्यांनी थोडक्यात संस्थेची माहिती दिली. भाषेमुळे ज्ञान मिळत नाही. भाषा हे एक ज्ञानाचे साधन आहे. 'पहिलीपासून इंग्रजी', 'मातृभाषा व स्वभाषा' हे संशोधन प्रकल्प संस्थेने पूर्ण केले असल्याचे त्यांनी सांगितले. पहिलीपासून इंग्रजी या शासनाच्या निर्णयाविरुद्ध संस्थेने न्यायालयात दाद मागितली असल्याचेही त्यांनी सांगितले.

'बँक ऑफ महाराष्ट्र'चे प्रतिनिधी म्हणून बँकेचे उपमहाप्रबंधक श्री. श्याम

भुर्के यांनी बँक, मराठीकरिता कोणती कामे करते हे सांगितले. ग्रामीण भागातील आपल्या ग्राहकांसाठी बँक कागदपत्रे मराठीतून ठेवते. ग्रामीण भागात साक्षरतेचेही काम बँक करते. "बचत नको खातं उघडा", "अंगठा नको सही करा" अशा बँकेच्या घोषणा आहेत. मराठी संस्थांना बँक अर्थसाहाय्य करते. संत तुकारामांच्या सचित्र इंग्रजी गाथेकरिता बँकेने १५ लक्ष मंजूर केले आहेत. आतापर्यंत दोनशे दिवाळी अंकांना जाहिराती दिल्या आहेत. हा कार्यक्रम आयोजित करणाऱ्या मराठी अभ्यास परिषदेतर्फे दिल्या जाणाऱ्या 'महाबँक पुरस्कारा'ची रक्कम बँक ऑफ महाराष्ट्र देते, असे त्यांनी नम्रपणे सांगितले.

'मराठी भाषा अभ्यास परिषदे'च्या कार्यवाह डॉ. नीलिमा गुंडी यांनी संस्थेची माहिती दिली. परिषदेची स्थापना १ जाने. १९८२ रोजी झाली. मराठीच्या विकासासाठी भाषाविषयक वस्तुनिष्ठ दृष्टिकोन निर्माण करणे, राज्यभाषा हीच ज्ञानभाषा, जीवनाच्या विविध क्षेत्रांत मराठीचा वापर, मराठी भाषकांच्या भाषिक गरजांकडे लक्ष पुरविणे इत्यादी उद्देश संस्थेसमोर असल्याचे त्यांनी सांगितले. परिषदेतर्फे भाषाविषयक लेखनासाठी ५००० रु. रोख रकमेचा 'महाबँक पुरस्कार' दिला जातो. 'भाषा आणि जीवन' हे नियतकालिकही चालवले जाते. शासन व्यवहारात, लोक व्यवहारात व जनमानसात मराठीला सन्मानाचे स्थान मिळण्यासाठी ही संस्था सर्वतोपरी प्रयत्न करील, असे त्यांनी सांगितले.

'मराठी विज्ञान महासंघा'चे प्रतिनिधशी श्री. प्रभाकर पंडित यांनी सांगितले की, महासंघाच्या १० शाखा आहेत. २००० सभासद आहेत. विज्ञान प्रचार व प्रसार मराठीतून करणे, मराठीला ऊर्जितावस्था प्राप्त करून देणे हे उद्देश समोर ठेवून संस्था कार्यरत आहे. संघाची 'विज्ञानपत्रिका' २५ वर्षे चालू आहे. विज्ञानविषयक ४० पुस्तिका मराठीतून प्रकाशित केल्या आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

'महाराष्ट्र साहित्य परिषदे'च्या, मराठी भाषाविषयक कार्याची माहिती डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी दिली. परिषदेच्या घटनेतच "मराठीचे हितरक्षण करणे व मराठीचे संवर्धन करणे" असे म्हटले असल्याचे त्यांनी सांगितले. परिषद ही साहित्याप्रमाणे भाषेविषयीचे काम करते. १९३०-३५ सालांत संस्थेने लेखन नियमांत बदल करण्याचा उपक्रम केला होता. त्याला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे त्यांनी सांगितले. १९६२ साली महामंडळाचे नियम निघाले तेव्हाही म.सा.प.चा सहभाग होता असे डॉ. जोगळेकर यांनी नमूद केले. परिषदेतर्फे मराठीच्या परीक्षा

घेतल्या जातात. गोवा, गुजरात, मध्यप्रदेश या प्रदेशांतील विद्यार्थी या परीक्षेस बसतात. पुण्यातील अमराठी लोकांसाठी काही वर्षे मराठीचे वर्ग घेतले जात परंतु या उपक्रमास नंतर प्रतिसाद मिळाला नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

'मराठी विज्ञान परिषदे'चे प्रतिनिधी म. ना. गोगटे हे उपस्थित होते. त्यांनी संस्थेची माहिती दिली. त्यात विज्ञान कथा स्पर्धा, नियतकालिक, विज्ञान संमेलन, विज्ञान संकल्पनांचा सचित्र कोश इत्यादी उपक्रमांचाही अंतर्भाव होता.

'मराठी बोली साहित्य महामंडळा'चे श्री. मिलिंद सोनार हे उपस्थित होते. त्यांनी "बोलीच्या विकासाचा कार्यक्रम व त्याद्वारे मराठीचा विकास" असे त्यांच्या मंडळाचे सूत्र मांडले. अखिल भारतीय मराठी बोली संमेलन नुकतेच २००४ मध्ये घेतले गेले असल्याचे त्यांनी सांगितले.

'राज्य मराठी विकास संस्थे'ची लिखित माहिती डॉ. मृणालिनी शहा यांनी वाचून दाखविली. १ मे १९९२ रोजी संस्थेची स्थापना झाली असून मराठीच्या विकासासाठी आणि मराठी भाषेच्या वापरासाठी संस्था कार्य करते. त्यासाठी आजवर संस्थेने काही ग्रंथ व कोश प्रकाशित केले असल्याचे सांगून काही प्रमुख ग्रंथांची नावेही त्यांनी सांगितली.

या सत्राचे अध्यक्ष, डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात गेल्या ४४ वर्षांत मराठीची पडझड का व कशी झाली या कारणांकडे लक्ष वेधले. महाराष्ट्राचे झपाट्याने शहरीकरण झाले. परप्रांतीय लोंढे येत राहिले. हळूहळू वेगळीच भाषिक संस्कृती निर्माण होऊ लागली. परप्रांतीयांच्या सोयीसाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळा आल्या. मुंबईतला मराठी माणूस मुंबईत उपरा झाला, अर्थसत्तेत मराठी माणसाला वाव राहिला नाही. या सगळ्याचा परिणाम भाषेवर झाला असल्याचे मत त्यांनी प्रतिपादन केले. प्रा. मृणालिनी शहा यांनी सहभागी झालेल्या मराठी भाषेविषयी आस्था असणाऱ्या सर्व संस्था प्रतिनिधींचे आभार मानले.

दुसऱ्या सत्रात "आजच्या मराठी विषयीची माझी प्रतिक्रिया" या विषयावर खुली चर्चा झाली. अध्यक्षस्थानी प्रा. रा. ग. जाधव होते. व्यक्तिगत पातळीवर मराठी भाषेसाठी काय करता येईल हे जाणून घेण्यासाठी या भागाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. नीलिमा गुंडी यांनी केले. शामला वनारसे, माधवी गंगापूरकर, दिवाकर मोहनी, शारदा शिंत्रे, सत्त्वशीला सामंत, शरच्चंद्र रानडे, शरच्चंद्र पानसे, राजकुंवर सोनवणे, रमण चितळे, रोहिणी भाटे,

वंदना भागवत, विश्वास देशमुख, मिलिंद सोनार व शुभानन गांगल यांनी या सत्रात आपल्या प्रतिक्रिया नोंदविल्या. सर्वांच्या प्रतिक्रिया सकारात्मकच होत्या. व्यवसायाने सी. ए. असलेल्या विश्वास देशमुख यांची प्रतिक्रिया बोलकी होती. मराठीचा प्रश्न म्हणावा तेवढा गंभीर नाही. सगळे काम करू या, मराठीत बोलू या, म्हणजे मराठी टिकेल. कायद्याने मराठीची सर्व स्तरांवर सक्ती झाली तर वेगळे चित्र निर्माण होईल, ही त्यांची प्रतिक्रिया होती. शुभानन गांगल यांनी मानवी भाषाविज्ञान व उच्चारसातत्य याचा अभ्यास केला आहे. मराठी भाषेपुढील आव्हाने संगणकाच्या साहाय्याने आवाक्यात आणता येतील, असे मत त्यांनी व्यक्त केले.

आजच्या मराठीचे शुद्धलेखन, भाषा आणि संस्कृती यांच्या संकरामुळे निर्माण झालेले प्रश्न इत्यादींविषयी अनेकांनी चिंता व्यक्त केली. अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी मराठी भाषेसारखीच सर्व भारतीय भाषांची अवस्था चिंताजनक आहे का याचा विचार व्हावा, असे सुचवले. केवळ एकाच भाषेवर जगता येणार आहे का?, हाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मराठीला व्यापारी भाषेचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अशी सूचना त्यांनी केली.

दोन्ही सत्रांचे समालोचन करताना मराठी अभ्यास परिषदेचे अध्यक्ष डॉ. अशोक केळकर यांनी भाषिक विचाराचा भौतिक पाया लक्षात घ्यायला पाहिजे, असे मत मांडले. या चर्चेत मराठीविषयीचा न्यूनभाव आणि न्यूनगंड दोहोंचे दर्शन घडल्याचे सांगून ते म्हणाले, की महाराष्ट्र हा पुढारलेला आहे. पण ते पुढारलेपण पेलायची ताकद नसल्यामुळे, मराठी भाषा मागे पडत आहे. भाषेच्या प्रश्नात शुद्धलेखन हा कळीचा प्रश्न नसल्याचेही त्यांनी लक्षात आणून दिले.

या सत्रात डॉ. केळकर यांचा त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संस्थेतर्फे सत्कार झाला. नृत्यांगना रोहिणी भाटे यांच्या हस्ते डॉ. केळकरांना पुष्पगुच्छ देण्यात आला.

सहकार्यवाह डॉ. सुप्रिया सहस्रबुद्धे यांनी आभार प्रदर्शन केले. दोन्ही सत्रांना असलेली श्रोत्यांची उत्स्फूर्त उपस्थिती पाहता या विषयाबद्दलची मराठी भाषकांची आस्था विशेषत्वाने जाणवली.

■

स. प. महाविद्यालय, पुणे - ३०

१. 'मराठी अभ्यास परिषद पत्रिका : भाषा आणि जीवन'ची वर्गणी :

वर्गणी भरण्यासाठी पत्रिकेचे वर्ष जानेवारी ते डिसेंबर असे आहे. या त्रैमासिकाचे वर्षात चार अंक निघतात. १ जानेवारी, २००२ पासून वर्गणीचे दर पुढीलप्रमाणे आहेत.

वार्षिक वर्गणी - संस्थेला रु.१२५ फक्त, पंचवार्षिक वर्गणी रु. ५५० फक्त
व्यक्तीला रु.१०० फक्त, पंचवार्षिक वर्गणी रु. ४५० फक्त

२. आजीव वर्गणी :

मराठी अभ्यास परिषदेची **आजीव सदस्यत्व वर्गणी रु. १०००/- आणि नोंदणी शुल्क रु. १००/- फक्त. पूर्वीच्या आजीव सदस्यांनी वर्गणीतील वाढीव रक्कम रु. ४००/- भरावी, असे परिषदेतर्फे आवाहन करण्यात येत आहे.**

३. पैसे भरण्याबद्दल सूचना :

वर्गणी प्रत्यक्ष रोखीने किंवा धनादेशाने देता येईल. **कृपया मनिऑर्डर पाठवू नये.** धनादेश 'मराठी अभ्यास परिषद' या नावाने काढावा. **धनादेश पुण्याबाहेरच्या शाखेचा असल्यास रकमेत रुपये २०/- वटणावळ अधिक घालावी.** धनादेशासोबत आपले नाव, पत्ता, रक्कम, कोणत्या वर्षासाठी वर्गणी ते अवश्य लिहावे. पावती दिली जाईल. नमुना अंक मिळाला असल्यास कोणता अंक याचा उल्लेख करावा.

वर्गणी व तत्संबंधी पत्रव्यवहाराचा पत्ता : कार्यवाह, नीलिमा गुंडी, ३, अन्नपूर्णा, १२५९, शुक्रवार पेठ, सुभाषनगर गल्ली क्र. ५, वाडिया हॉस्पिटलसमोर, पुणे ४११ ००२. दू. क्र. २४४८६०१५

३. मागील अंक :

'भाषा आणि जीवन' हे त्रैमासिक १९८३ पासून प्रसिद्ध होत आहे. (१९८३ या वर्षी मात्र दोनच अंक निघाले आहेत.) काही अंकांचा अपवाद वगळता सर्व वर्षांचे अंक उपलब्ध आहेत. १९८३ ते १९९० पर्यंतच्या प्रत्येक अंकाची किंमत रु. १०/-, १९९१ पासून पुढील वर्षातील प्रत्येक सुट्या अंकाची किंमत रु. २०/- आणि २००२ पासून प्रत्येक सुट्या अंकाची किंमत रु. २५/-.


५. प्रकाशने :

या त्रैमासिकातील निवडक लेखांचे संपादित पुस्तक 'निवडक भाषा आणि जीवन' (किंमत रु. २००) परिषदेच्या कार्यवाहांकडे अथवा मेहता पब्लिशिंग हाउसमध्ये मिळू शकेल. तसेच 'भाषांतरमीमांसा' हे पुस्तकही कार्यवाहांकडे अथवा प्रतिमा प्रकाशनाकडे उपलब्ध आहे.

६. जाहिरातीसाठी दर :

पूर्ण पान रु. ७५०/- , अर्धेपान रु. ४००/-, पाव पान रु. २५०/-, शुभेच्छा सूचना रु. १००/-, आवरण पृष्ठ तीन / चार रु. ८००/- जाहिरात मराठीत असल्यास उत्तम, हिंदीत, इंग्रजीत असल्यास चालेल.

R.N.I. नोंदणी क्रमांक : ०-४००४८/८३
बुकपोष्ट - बुकपॅकेट - त्रैमासिक



प्रति

प्रेषक

कार्यवाह, मराठी अभ्यास परिषद
३, अन्नपूर्णा, १२५९, शुक्रवार पेठ, सुभाषनगर गल्ली क्र. ५, वाडिया हॉस्पिटलसमोर,
पुणे ४११ ००२. (दू. क्र. २४४८६०१५)

अनुक्रमणिका